नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २४४ * ✲ अकोला ✲ | गुरुवार, दिनांक २७ फेब्रुवारी २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात

## लष्कराच्या वाहनावर दहशतवादी हल्ला

■ **वृत्तसंस्था, जम्मू, दि. २६ :**
जम्मू आणि काश्मीरमधील राजौरी येथे बुधवारी दुपारी लष्कराच्या वाहनावर दहशतवादी हल्ला झाला. सुंदरबनी परिसरात दहशतवाद्यांनी घात लावून गोळीबार केला आहे. हल्ल्यानंतर लगेचच परिसराला घेराव घालण्यात आला.

घटनास्थळी अतिरिक्त कुमक पाठवण्यात आली आहे. दहशतवाद्यांना पकडण्यासाठी मोठ्या प्रमाणात शोध मोहीम सुरू करण्यात आली आहे. यापूर्वी ७ फेब्रुवारी रोजी भारतीय सैन्याने ७ पाकिस्तानी घुसखोरांना ठार केल्याची माहिती समोर आली होती. त्यामध्ये तीन पाकिस्तानी लष्करी जवानांचाही समावेश होता. वृत्तानुसार, नियंत्रण रेषेजवळ घुसखोरीचा प्रयत्न झाला तेव्हा ही घटना घडली.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## पुण्याला कलंक

सध्या कुठे कोणती घटना होईल. माणुसकीला कुठे काळीमा फासला जाईल. माणसाच्या रूपात कुठे सैतान धावून येईल. माणूस कसा पशुवत वागेल. याचा काही नेम नाही. मात्र माणसातील पशुपणाचा दाखला पुण्यातील स्वारगेट बस स्थानकात दिसून आला आहे. जी धक्कादायक घटना या बसस्थानक घडली. ती पुण्यासारख्या सुसंस्कृत नगरात घडलेली आहे. हे त्याहूनही भयानक आहे. ज्या ठिकाणी एका 26 वर्षीय तरुणीवर पाशवी अत्याचाराची घटना घडली. त्या ठिकाणी जवळपास 22 ते 23 सुरक्षारक्षक आहेत. त्या ठिकाणी एका असहाय्य तरुणीचे अब्रूरक्षण करण्यास ते समर्थ नाहीत, याचा अर्थ काय. दत्तात्रय नावाचा नराधम येतो काय. त्या तरुणीला ताई-ताई म्हणून त्या एकट्या तरुणीशी ताई म्हणून गोड-गोड बोलतो काय. तिला साताऱ्याकडे जाणाऱ्या बसमध्ये बसवण्याची बतावणी करतो काय. बंद असलेल्या निर्मनुष्य बसमध्ये तिला घेऊन जातो काय आणि ताई म्हणत असलेला हा नराधम तिच्यावर अत्याचार करतो काय. या सगळ्या घटनाक्रमात त्या नराधमाने दाखवलेले निर्ढावलेपण आणि एकूणच घटना अनाकलनीय आहे. हा माणूस आता फरार आहे. तो लवकरच सापडेल. त्याच्यावर कारवाई होईल. खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अपराध्याला तात्काळ पकडून त्याच्यावर कारवाई करण्याची सूचना दिलेली आहे. झालेला हा प्रकार किती भयानक आहे. याची आपण कल्पनाही करू शकत नाही. त्या नराधमाने ताई म्हटल्यामुळे विश्वासाने ज्याला भाऊ समजले. तो भाई निघाला. निव्वळ भाई नव्हे तर अतिशय कसाई निघाला. या ठिकाणी एका बंद असलेल्या जुन्या गाडीत अनेक कंडोम्सची पाकिटे, महिलांच्या साड्या, स्त्रियांची अंतर्वस्त्रे यासारख्या वस्तू मिळालेल्या आहेत. म्हणजेच स्वारगेट बस स्थानक हे अशा प्रकारच्या घटनांसाठी नैतिक किंवा अनैतिक मागार्ने या गोष्टी करण्यासाठी कुप्रसिद्ध असावे. त्या ठिकाणच्या सुरक्षा रक्षकांना निलंबित करण्यात आले आहे. या घटनेची चौकशी जे कोणी करत असतील. त्यांनी केवळ या घटनेची चौकशी करू नये. तर खोलात जाऊन या स्वारगेटच्या परिसरात यापूर्वी किती किती घोडेस्वार कधीपासून गाढवपणा करीत होते. याचाही शोध घेतला गेला पाहिजे. माणूस म्हणून आपल्याला काही लाजलज्जा आहे की नाही, असा प्रश्न स्वाभाविकपणे सामान्य माणसाच्या मनात उभा राहू शकतो. ही घटना आज उजेडात आली. परंतु त्या ठिकाणी जे काही साहित्य मिळाले आहे त्यावरून स्वारगेट हा अशा घटनांचा अड्डा आहे, असे म्हटले तर कोणालाही वाईट वाटू नये. महाराष्ट्रात अशा प्रकारच्या अनेक घटना आपण ऐकलेल्या असतील. पण एखाद्या बस स्थानकात ज्या ठिकाणी सुरक्षा रक्षकांची केबीन आहे. जिथे 23 सुरक्षा रक्षकांची नियुक्ती झालेली आहे. तिथेच जवळपास एखाद्या असहाय्य तरुणीचे अब्रूरक्षण करण्यास हे सुरक्षेचे रक्षक समर्थ नसतील. तर त्यांच्यावर अत्यंत कठोर अशी कारवाई झाल्याशिवाय जनतेचे समाधान होणार नाही. ज्या बसमध्ये ही घटना घडली. ती बस शिवशाही होती. ज्या शिवाजी महाराजांनी स्त्रियांकडे वाकड्या नजरेने पाहणाऱ्या एका नराधमाचा चौरंगा केला होता. चौरंगा करणे म्हणजे त्याचे दोन्ही हात आणि दोन्ही पाय छाटून टाकले होते. शिवाजी राजांच्या काळातील शिवशाहीत असे कृत्य करण्याचा विचार करणाऱ्या आणि प्रत्यक्षात करणाऱ्या नराधमांना कठोर शासनाची तरतूद होती. आता ही घटना घडल्यावर त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पोलीस बल तैनात करण्यात आलेले आहे. या स्थानकाचे प्रमुख नियंत्रक त्यांचे अधिकारी व कर्मचारी यांना अशा प्रकारच्या घटना होत आहेत. हे माहीत नसावे काय. स्वारगेट हे बस स्थानक नेमके अशा गोष्टी करण्यासाठी कसे काय उपलब्ध झाले. याचीही चौकशी झालीच पाहिजे. मुळात कोणत्याही गंभीर घटनेबद्दल दोन चार दिवस चर्चा होते आणि मग वषार्नुवर्षे ते प्रकरण न्यायालयात रेंगाळत राहते. ही घटना घडली तेव्हा त्या ठिकाणी तरुणीचा आवाज नक्कीच निघाला असेल. मग एवढ्या मोठ्या बसस्थानकात पहाटे साडेपाचच्या सुमारास एकही माणूस हजर नव्हता काय किंवा, जे कोणी हजर होते ते माणूस नव्हते काय. आज काल सर्व ठिकाणी सीसीटीव्ही लावण्यात आलेले आहेत. या बस स्थानकातही ते असतील, नव्हे आहेत. बलात्कार करणारा हरामखोर नेमका त्या ठिकाणी कसा आला आणि त्याने बिनधास्तपणे हे पशुलाही लाजवणारे लांच्छनास्पद कृत्य कसे केले. यावरूनच तो या बस स्थानकाच्या चांगलाच परिचयाचा असावा. असे दिसते आहे. केवळ पुण्याच्याच नव्हे तर सबंध महाराष्ट्राच्या हृदयात कालवाकालव करणारी ही घटना माणुसकीला लाजवणारी तर आहेच. पण माणूस किती हीन स्तरावर जाऊ शकतो. याचाही हा नमुना आहे. ही घटना म्हणजे स्वारगेट अत्याचार प्रकरण या नावाने पुण्याच्या नावाला लागलेला हा मोठा कलंक आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# स्वारगेट घटनेने संतापाची लाट

# शिवशाहीत तरूणीवर बलात्कार

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २६ :**
पुण्यातील स्वारगेट बसस्टँड परिसरात उभ्या असलेल्या एका शिवशाही बसमध्ये २६वर्षीय तरुणीवर बलात्कार झाल्याची संतापजनक घटना उजेडात आली आहे. बुधवारी पहाटे ५.३० च्या सुमारास ही घटना घडली. ती दुपारी समोर आली. या घटनेमुळे महाराष्ट्रात संतापाची लाट पसरली आहे.

पीडित तरुणी पुण्याहून फलटणला जात होती. बुधवारी पहाटे स्वारगेट बसस्थानकावर थांबली होती. तेव्हा एका अनोळखी व्यक्तीने तिची बस दुसऱ्या ठिकाणी थांबल्याचे सांगितले. पण तरुणीने त्याच्यावर विश्वास ठेवला नाही. त्यावर तरुणाने तिच्या एकटेपणाचा फायदा घेत तिला विश्वासात घेतले. त्याने जवळच उभ्या असलेल्या एका शिवशाही बसमध्ये नेले. तिथे त्याने तिच्यावर पाशवी बलात्कार केला व तेथून पळ काढला.






### फाशीशिवाय दुसरी कोणतीही शिक्षा असू शकत नाही

स्वारगेट बस स्थानकात आपल्या एका भगिनीवर झालेल्या अमानुष कृत्याने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. ही घटना अत्यंत क्लेशदायक, संतापजनक आणि सुसंस्कृत समाजाच्या तोंडाला काळीमा फासणारी आहे. या अक्षम्य गुन्ह्यासाठी आरोपीला फाशीशिवाय दुसरी कोणतीही शिक्षा असू शकत नाही, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नोंदवली आहे.

या घटनेमुळे हादरलेल्या तरुणीने आपल्या मित्राला फोनवरून ही घटना सांगितली. त्यानंतर मित्राने तिला तत्काळ पोलिसांकडे जाण्याचा सल्ला दिला. तरुणीने स्वारगेट पोलिस ठाणे गाठून आपबिती कथन केली. पीडितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल करत घटनास्थळी जाऊन तपास सुरू केला. या घटनेची वाच्यता होताच पुण्यात एकच खळबळ माजली.

पोलिसांनी स्वारगेट बस स्थानक परिसरातील सीसीटीव्हीच्या आधारावर आरोपीची ओळख पटवली आहे. दत्तात्रय रामदास गाडे असे आरोपीचे नाव आहे. त्याच्यावर शिक्रापूर व शिरूर पोलिस ठाण्यात गुन्ह्याची नोंद आहे. सध्या तो फरार आहे. त्याच्या मुसक्या आवळण्यासाठी पोलिसांचे पथक त्याच्या मागावर निघाले आहेत. त्याला लवकरच अटक करण्याचा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

या घटनेबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आरोपीला तात्काळ अटक करण्याचे आदेश पुणे पोलीस आयुक्तांना दिले आहेत. या गुन्ह्याची गंभीर दखल घेत मुख्यमंत्र्यांनीही पोलिसांना आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत.

## वर्धा नदीवर आंघोळीला गेलेल्या तिन युवकांना जलसमाधी

■ **महासागर प्रतिनिधी**
**राजुरा (चंद्रपूर), दि. २६ :**
जवळ असलेल्या चुनाळा येथील शेजारी नागरिकांसोबत महाशिवरात्रीच्या पर्वावर वर्धा नदी येथे आंघोळ करण्यासाठी गेलेल्या तुषार शालिक आत्राम (वय १७) मंगेश बंडू चणकापुरे ( वय २०) अनिकेत शंकर कोडापे (वय १८) सर्व राहणार चुनाळा यांना खोल पाण्याचा अंदाज न आल्याने तिन्ही युवकांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना आज बुधवार २६ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजता घडली.








महाशिवरात्री निमित्त चुनाळा येथील काही नागरिक नजिकच्या वर्धा नदी घाटावर आंघोळ करण्यासाठी जात असता घराजवळील तुषार आत्राम, मंगेश चणकापुरे, अनिकेत कोडापे हे तिन्ही त्यांच्यासोबत गेले. नदीपात्रात महिला एका बाजूला आंघोळ करीत असताना काही अंतरावर जाऊन तिन्ही युवक आंघोळ करीत होते. यावेळेस त्यांना खोल पाण्याचा अंदाज न आल्याने ते पाण्यामध्ये बुडू लागले.

त्यांच्या ओरडण्याचा आवाज आला असता जवळ असलेला रामचंद्र रागी या युवकाने त्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला . परंतु त्यांना वाचविण्यात यश आले नाही. घटनेची माहिती चुनाळाचे सरपंच बाळनाथ वडस्कर यांनी राजुरा पोलिसांना माहिती दिली. घटनास्थळी राजुरा पोलिस पोहचले. सदर घटना बल्लारपूर ठाण्याच्या हद्दीत येत असल्याने बल्लारपूर पोलीस घटनास्थळी दाखल होऊन मृतदेहाचा शोध घेऊ लागले. राजुराचे तहसीलदार डॉ. ओमप्रकाश गोंड यांनी आपत्ती विभाग चंद्रपूर येथे फोन करून बोटीची व्यवस्था केली व बोटीद्वारे मृतदेहाचा शोध घेणे सुरू आहे. तुषार आत्राम याचा मृतदेह मिळाला. दोन युवकांचे मृतदेह मिळाले नव्हते.

घटनास्थळी राजुराचे सहाय्यक पोलिस निरीक्षक हेमंत पवार, राजुराचे नायब तहसीलदार चंद्रशेखर तेलंग, चुनाळा ग्राम पंचायत सरपंच बाळनाथ वडस्कर व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## सुरक्षा केबिनची तोडफोड

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २६ :**
पुण्यातील स्वारगेट बसस्थानकावर शिवशाही बसमध्ये घडलेल्या बलात्काराच्या घटनेमुळे अवघा महाराष्ट्र हादरला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने या प्रकरणी वसंत मोरे यांच्या नेतृत्वात आंदोलन करून बसस्थानकामधील सुरक्षा केबिनची तोडफोड केली.

यावेळी मोरे यांनी बसमधील कंडोम्स व साड्यांचा खच दाखवत या ठिकाणी दररोज बलात्कार होत असल्याचा गंभीर आरोप केला.

## दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईचे आदेश

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :**
या घटनेच्या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री सरनाईक यांनी तातडीने कठोर पावले उचलत, बसस्थानकावरील सुरक्षेतील हलगर्जीपणाला जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहे.

परिवहन मंत्र्यांनी स्थानकप्रमुख आणि आगार व्यवस्थापक यांची विभागीय चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. चौकशीत दोषी आढळल्यास त्यांना तात्काळ निलंबित करण्यात येईल.

स्वारगेट बसस्थानकावरील सर्व सुरक्षा रक्षक तात्काळ बदलण्यात यावेत, त्यांच्या जागी नवे सुरक्षारक्षक नेमण्यासाठी संबंधित सुरक्षा मंडळाला सूचना द्याव्यात, या प्रकरणाचा सविस्तर अहवाल पुढील ७ दिवसांत सादर करण्याचे आदेश त्यांनी दिले. महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी विशेष बैठक आयोजित करण्यात येत असल्यचेही सरनाईक यांनी सांगितले.

## विक्रमी स्नानासह महाकुंभचे समापन

■ **वृत्तसंस्था, प्रयागराज, दि. २६ :**
आज महाकुंभाचा शेवटचा दिवस होता. सकाळी १० वाजेपर्यंत ८१ लाख लोकांनी स्नान केले. गेल्या ४४ दिवसांत ६५ कोटी भाविकांनी स्नान केले.

४५ दिवस चाललेल्या महाकुंभाचा समारोप महाशिवरात्री उत्सवाच्या स्नानाने झाला. आज शिवरात्रीला ३ कोटी भाविक आल्याचे सांगण्यात येत असून, एकूण आकडा ६६ ते ६७ कोटींवर पोहोचल्याचा दावा केला जात आहे. जगातील हिंदूंच्या लोकसंख्येच्या निम्म्या लोकसंख्येइतके लोक येथे आले होते, असा दावा करण्यात येत आहे.




## नमो किसान निधीत ३ हजार रुपये वाढवणार

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २६ :**
केंद्र आणि राज्य सरकार शेतकऱ्यांच्या विकासासाठी समर्पित असून या दिशेने जोरकस प्रयत्न सुरू आहेत. शेतकऱ्यांना अडचणीच्या काळात प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा फायदा होत आहे. राज्य शासनही केंद्राप्रमाणे राज्यातील शेतकऱ्यांना नमो किसान सन्मान निधी योजनेंतर्गत ६ हजार रुपये देत असून लवकरच हे अर्थसाहाय्य ३ हजार रुपयांनी वाढवण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बिहारमधील भागलपूर येथे प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या १९ व्या हप्तयाचे वितरण झाले. या वितरणाचा राज्यस्तरीय कार्यक्रम मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वनामती येथील वसंतराव नाईक स्मृती सभागृहात आयोजित करण्यात आला. या वेळी ते बोलत होते.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात मराठवाडा व विदर्भातील उर्वरित भागात या योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले . या कार्यक्रमाला कृषी आणि इतर विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## एकनाथ शिंदेंकडून गोऱ्हेंची पाठराखण

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २६ :**
अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या एका चर्चा सत्रात शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या नीलम गोऱ्हे यांनी ठाकरे गटावर तसेच उद्धव ठाकरे यांच्याविषयी वादग्रस्त विधान केले होते. यावर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नीलम गोऱ्हे यांची पाठराखण केली आहे.



अंधेरी येथील जाहीर सभेत बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, नीलम गोऱ्हे दिल्लीच्या व्यासपीठांवरुन एक वाक्य बोलल्या आता ते व्यासपीठ बरोबर होते की चुकीचे होते हा भाग वेगळा. परंतु ते काही जणांना एवढे झोंबले की मिरच्या लागल्या. हा एकनाथ शिंदे त्यांना पुरुन उरला होता. गोऱ्हेंनी त्यांचे काळे धंदे बाहेर काढल्याचे शिंदे म्हणाले.

## अधिकाऱ्याच्या गैरहजेरीत खुर्चीला हार घालून चित्रीकरण करणाऱ्या विद्यार्थी संघटनेच्या प्रदेश अध्यक्षावर गुन्हा दाखल

**भिवंडी, दि. २६ : प्रतिनिधी**

भिवंडी महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागात प्रशासन अधिकारी नसल्याचे पाहून त्यांच्या कार्यालयात घुसून त्यांच्या खुर्चीला हार घालत मोठमोठ्याने घोषणाबाजी करीत चित्रीकरण केल्याने बहुजन विद्यार्थी संघटनेच्या प्रदेश अध्यक्षांवर निजामपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचे पडसाद पालिकेच्या कार्यालयात उमटले आहेत.याप्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार, महापालिकेचे उपायुक्त (आरोग्य) यांच्या कार्यालयात मनपाच्या प्राथमिक शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी नितीन पाटील हे कार्यालयीन बैठकीसाठी उपस्थित असताना त्यांच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या कार्यालयात गुरुवारी दुपारी साडेबारा वाजताच्या सुमारास अनिल वाणी व इतर १० ते १५ व्यक्ती यांनी उच्च आवाजात घोषणाबाजी करून प्रशासन अधिकारी जागेवर नसल्याचे पाहुन त्यांच्या दालनात घुसुन त्यांच्या खुर्चीस हार घातला आणि मोठ्यामोठ्याने घोषणाबाजी करून गोंधळ घातला.त्याचे चित्रिकरण करून फोटो काढले व कर्मचा-यांचे, अधिका-यांचे मनोबल खच्चीकरण करून त्यांना धमकावले व घाबरवण्याचे कृत्य केले. त्यानंतर अनिल वाणी हे उपायुक्त (शिक्षण) यांच्या दालनाबाहेर आले. त्यांच्या कार्यालयात शिक्षण विभागाची महत्त्वपुर्ण बैठक सुरू असताना त्या ठिकाणी अधिकारी व कर्मचारी उपस्थित असताना अनिल वाणी यांनी शिष्टमंडळासह घोषणाबाजी करीत बैठकीत विनापरवानगीने प्रवेश करून बैठक बंद पाडली आणि गोंधळ घालत त्यांचे चित्रीकरण करण्यास सुरवात केली. त्यानंतर मोठ्या आवाजात उपायुक्त (शिक्षण) यांचे सोबत वादविवाद करू लागले.सदर वादविवादामुळे महानगरपालिकेचे सुरक्षा कर्मचारी घटनास्थळी आले. तेंव्हा त्यांच्या सोबत देखील विद्यार्थी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या आवाजात वादविवाद करून महानगरपालिकेच्या शासकिय कामकाजात अडथळा निर्माण केला.याप्रकरणी शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी नितीन पाटील यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अहवालानुसार निजामपूर पोलीस ठाण्यात अनिल वाणी (४५) व इतर १० ते १५ व्यक्ती यांच्या विरोधात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा नोंद करून या घटनेचा तपास सपोनि रायपुरे करीत आहे.

## नवी मुंबई महापालिकेचा 5 हजार 700 कोटींचा अर्थसंकल्प

### कोणतीही करवाढ, दरवाढ न करता उत्पन्न वाढीवर भर

**नवी मुंबई, दि. २६ : प्रतिनिधी**




नवी मुंबई महापालिका प्रशासनाने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी मांडलेला ५ हजार ७०९ कोटी रुपये खर्चाचा अर्थसंकल्प आज महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी मंजूर केला. या अर्थसंकल्पात महापालिका आयुक्तांनी उत्तम राहणीमान आणि आनंददायी रहिवास यावर विशेष भर दिला आहे. माझे शहर, माझा अभिमान हा संकल्प प्रत्येक नागरिकाच्या मनात खोलवर रुजवावा यासाठी विशेष उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कोणतीही करवाढ आणि दरवाढ न करता या अर्थसंकल्पात उत्पन्न वाढीवर विशेष भर देण्यात आला असल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

नवी मुंबई महापालिका प्रशासनाने गेल्या वर्षी सुमारे पाच हजार कोटींचे बजट सादर केले होते. यंदा त्यामध्ये आणखी सुमारे ७०० कोटी रुपयांची वाढ करण्यात आली आहे. या अर्थसंकल्पात महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी आरोग्य, शिक्षण आणि स्वच्छतेवर विशेष भर दिला आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा यासाठी पालिका विशेष लॅब तयार करणार आहे. विद्यार्थ्यांना भौगोलिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक विषयाचे ज्ञान मिळवण्यासाठी ग्रंथालय उभे राहणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासून शिस्त आणि देशप्रेम विकसित करण्यासाठी शाळांमध्ये एनसीसी विभाग सुरू करण्यात येणार आहे. वैद्यकीय सेवेत आणखी सुधारणा घडवून मनुष्यबळ उपलब्ध करण्यासाठी नर्सिंग कॉलेज सुरू करण्याचाही महापालिकेचा प्रयत्न आहे, असे महापालिका आयुक्त कैलास शिंदे यांनी अर्थसंकल्प सादर करताना सांगितले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे, शहर अभियंता शिरीष आरदवाड, एनएमएमटीचे महाव्यवस्थापक योगेश कडूसकर, मुख्य लेखा अधिकारी सत्यवान उबाळे, उपायुक्त किसनराव पलांडे, नयना ससाणे आदी उपस्थित होते.

शिहरात बाधित होणाऱ्या नागरिकांना तात्पुरत्या स्वरुपात निवारा मिळावा यासाठी संक्रमण शिबीर तयार करण्यात येणार आहे. यासाठी सिडकोकडून काही सदनिका पालिका उपलब्ध करून घेणार आहे.

वाशी येथील ईटीसी केंद्रात संगणक लॅब तयार करण्यात येणार आहे.शहरातील कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध भागांत मोठ्या प्रमाणात बांबूची लागवड करण्यात येणार आहे. मोरबे धरण क्षेत्रात ३३ हजार आणि तुर्भे क्षपणभूमीच्या परिसरात तीन हजार बांबूची झाडे लावण्यात येणार आहेत.शहरात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढावा यासाठी प्रशासन प्रयत्न करीत आहे. या वाहनांना सहजासहजी चार्जिंग उपलब्ध व्हावी यासाठी विविध भागांत १४५ चार्जिंग स्टेशन उभा करण्यात येणार आहेत.

नवी मुंबई शहर हे देशात तिसऱ्या क्रमांकाचे स्वच्छ शहर म्हणून ओळखले जाते. त्यामुळे हे शहर पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली आहे. या येणाऱ्या पाहुण्यांचे स्वागत करण्यासाठी शहरात येणाऱ्या सर्वच मार्गांवर प्रवेशद्वार उभे करण्यात येणार आहे.

**दोन वर्षांत एनएमएमटी होणार डिझेलमुक्त**

नवी मुंबई महापालिकेच्या परिवहन सेवेत सध्या ५४७ बसेस आहेत. त्यापैकी ३२० बसेस या सीएनजी आणि इलेक्ट्रिक आहेत. उरलेल्या २०० बसेस या डिझेलवर धावतात. मात्र आता टप्प्याटप्प्याने या डिझेल बसेस कमी करून त्या जागेवर सीएनजी आणि इलेक्ट्रिक बसेस आणण्यात येणार आहेत. पुढील दोन वर्षांत एनएमएमटी पूर्णपणे डिझेलमुक्त होणार आहे, असेही आयुक्तांनी यावेळी जाहीर केले.

## घोडबंदर पानखंडाला पाणी देण्यास केंद्राची मंजुरी हवी

**ठाणे, दि. २६ : प्रतिनिधी**

घोडबंदर भागातील पानखंडा, देवाचा पाडा, बमनाली पाड्यावरील तहानलेल्या आदिवासींना त्यांचे वास्तव्य खासगी वनक्षेत्रात असल्याने मुंबई उच्च न्यायालयातील प्रलंबित याचिकेमुळे पाणीपुरवठा करता येणार नाही. आदिवासींना पाणी देण्याकरिता येथे काम करायचे, तर केंद्र सरकारची परवानगी घ्यावी लागेल, असा दावा वन खात्याने केला.

तहानलेल्या पाड्यांबाबत वृत्तपत्रांनी तेव्हा कुठलीही प्रतिक्रिया न देणाऱ्या वन खात्याने ठाणे महापालिकेने पाणीपुरवठ्याची लगबग सुरू करताच प्रलंबित न्यायालयीन दाव्याचे कारण सांगून आपली जबाबदारी झटकली आहे.

**प्रकरण न्यायप्रविष्ठ**

घोडबंदर भागातील पानखंडा आणि त्याच्या आजूबाजूच्या आदिवासी पाड्यांवरील पाण्याच्या समस्येला समाजिक व प्रसारमाध्यमांनी वाचा फोडली. येऊरचा वन विभाग येथील कामासाठी परवानगी देत नसल्याचा आरोप ठाणे महापालिकेने केला.

आता वन विभागाने म्हटले आहे की, पानखंडा आदिवासी पाडा हा नियतक्षेत्र ओवळा राखीव वन सर्व्हे क्रमांक २९१ (संपादित खाजगी वन असून, त्यास राखीव वनाचा दर्जा आहे.) या क्षेत्राबाबत उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल असून, ते प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

**प्रस्ताव अद्याप सादर नाही**

वनक्षेत्रातील अतिक्रमणधारकास नव्या सुविधा पुरविल्यास उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशांची अवमान होण्याची शक्यता आहे, तसेच कोणतेही वनेतर काम करण्यासाठी परवानगी देण्याचा अधिकार आमच्या कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रात नाही.

यासाठी केंद्र शासनाची पूर्वपरवानगी बंधनकारक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. याची माहिती महापालिकेच्या संबंधित विभागाला दिल्याचे येऊर वन विभागाने स्पष्ट केले. त्यानुसार प्रस्ताव सादर करण्यास त्यांना सांगितल्याचे वन विभागाने सांगितले; परंतु महापालिकेने तसा प्रस्ताव अद्याप तयार करून केंद्राकडे सादर केला नसल्याची माहिती दिली.

## उल्हासनगर मध्ये बालविवाह रोखण्यात पोलिसांना यश, दहा जणांविरुध्द गुन्हा दाखल

**उल्हासनगर, दि. २६ : प्रतिनिधी**

उल्हासनगर कॅंप ५ येथील भाटिया चौकातील एका हॉल मध्ये बालविवाह संपन्न होत असल्याचे हिललाईन पोलिस व महिला बाल कल्याण विभाग यांना समजताच त्यांनी सयुक्त धडक कारवाई करत तो बाल विवाह रोखला असुन मुलगी १६ वर्षाची असल्याने मुलीला ताब्यात घेवुन तिची रवानगी बाल सुधारगृहात करुन मुलीचे आई वडील , नवरा मुलगा व त्याचे आई वडील यांच्यासह इतर ५ असे एकुण १० जणावर हिल लाईन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करणात आला आहे. या बाल विवाह प्रकरणी उल्हासनगर मध्ये एकच खळबळ उडाली आहे.

उल्हासनगर कॅंप ५ येथील भाटीया चौकात असलेल्या एका हॉल मध्ये बाल विवाह होत असल्याची माहीती कोणी तरी अज्ञात इसमाने चाईल्ड हेल्प लाईन पुणे येथे त्यांच्या ई मेल वर देण्यात आली होती. तेव्हा या माहीती नुसार चाईल्ड हेल्प लाईन ने या बाबत महिला बाल कल्याण विभाग व हिल लाईन पोलिस यांना कळवले , तेव्हा ह्या दोन्ही यंत्रणा यांनी त्या हॉल मध्ये जावुन होणारा बाल विवाह रोखला असुन मुलीच्या जन्माचा पुरावा घेतला असता त्या पुराव्या वरुन सदर मुलगी ही १६ वर्ष तीन महिन्याची असल्याचे निष्पन्न झाले. तेव्हा पोलिस व महिला बाल कल्याण विभागाच्या पदाधिकाऱ्यानी सदर मुलीला बाल सुधार गृहात पाठवले आहे. तर हिल लाईन पोलिस ठाण्यात मुलीचे आई वडील , नवरा मुलगा व त्याचे आई वडील आणि इतर अशा १० जणाविरुध्द बाल विवाह प्रतिबंधक कायदा २००७ चे कलम ९, १०,११ प्रमाणे गुन्हा दाखल केला असल्याची माहीती हिल लाईन पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अनिल जगताप यांनी दिली असुन या गुंह्याचा तपास पोलिस उपनिरीक्षक मोरे हे करत आहेत.

## "राज्यात महिलांसाठी सुरक्षित जागा राहिलीच नाही का?" - सुप्रिया सुळेंनी व्यक्त केला संताप

**पुणे, दि. २६ : प्रतिनिधी**

पुण्यामध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. स्वारगेट एसटी स्टँड परिसरात उभ्या असलेल्या शिवशाही बसमध्ये २६ वर्षीय तरुणीवर बलात्कार करण्यात आला. पहाटे ५.३० वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. सुप्रिया सुळे यांनी या घटनेवर संताप व्यक्त केला आहे. "राज्यात महिलांसाठी सुरक्षित जागा राहिलीच नाही का?" असा सवाल विचारला आहे.

"पुण्यात दररोज कुठे ना कुठे गंभीर गुन्हे घडतच आहेत. त्यावर आळा घालण्यात गृहखात्याला यश आलेलं नाही. ही घटना म्हणजे कायदा सुव्यवस्थेची कशा पद्धतीने दुर्दशा झाली याचे प्रत्यंतर देणारी आहे" असं म्हणत निशाणा साधला आहे. सुप्रिया सुळे यांनी आपल्या ट्विटर अकाऊंटवरून याबाबत ट्विट केलं आहे. "अतिशय संतापजनक! स्वारगेटसारख्या गजबजलेल्या बस स्थानक परिसरात एका तरुणीवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे स्वारगेट बस स्थानकाच्या जवळच पोलीस चौकी आहे."

"पोलीस कर्मचारी बस स्थानकावर वेळोवेळी गस्त घालत असतात. तरीही अशा पद्धतीचा घृणास्पद गुन्हा करण्याची आरोपीची हिंमत होते ही बाब गुन्हेगारांना कायद्याचा धाक उरलेला नाही हे दर्शविणारी आहे. या राज्यात महिलांसाठी सुरक्षित जागा राहिलीच नाही का असा प्रश्नही यानिमित्ताने उपस्थित झाला आहे. पुण्यात दररोज कुठे ना कुठे गंभीर गुन्हे घडतच आहेत. त्यावर आळा घालण्यात गृहखात्याला यश आलेलं नाही."

"ही घटना म्हणजे कायदा सुव्यवस्थेची कशा पद्धतीने दुर्दशा झाली याचं प्रत्यंतर देणारी आहे. या प्रकरणातील आरोपीला कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे . यासाठी हा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवावा अशी आमची मागणी आहे" असं सुप्रिया सुळे यांनी म्हटलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी पुण्यातून फलटणच्या दिशेने प्रवास करत होती.

स्वारगेट एसटी स्टँड येथे थांबल्यानंतर एका अनोळखी व्यक्तीने तिची बस दुसऱ्या ठिकाणी थांबली असल्याचं सांगितलं. मात्र तरुणीने त्याच्यावर विश्वास ठेवला नाही. याच दरम्यान आरोपीने तिच्या एकटेपणाचा फायदा घेत तिला विश्वासात घेतलं आणि जवळ उभ्या असलेल्या एका बंद शिवशाही बसकडे घेऊन गेला. बस बंद असल्याचं लक्षात आल्यानंतरही आरोपीने तिला आत जाण्यास सांगितलं आणि स्वतःही बसमध्ये घुसला. त्यानंतर त्याने तिच्यावर जबरदस्ती केली आणि लगेचच तिथून फरार झाला.

## शेतकऱ्यांची फसवणूक करून बळजबरीने केलेल्या भूसंपादनाला तीव्र विरोध

**अंबरनाथ , दि. २६ प्रतिनिधी**

अंबरनाथ तालुक्यातील मौजे पाले येथील शेतकऱ्यांनी एमआयडीसीमधील जमीन मोजणीला तसेच शेतकऱ्यांची फसवणूक करून बळजबरीने केलेल्या भूसंपादनाला तीव्र विरोध दर्शवला आहे . भविष्यात जुलूम जबरदस्तीने जर भूसंपादन करण्याचा सरकारने प्रयत्न केल्यास शेतकऱ्यांनी आत्महत्येचा इशारा दिला आहे.

दरम्यान शेतकऱ्यांना विचारात व विश्वासात न घेता शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय महाराष्ट्र शासनाने उद्योग व्यवसायांसाठी एमआयडीसी करिता शेतकऱ्यांच्या वडिलोपार्जित मालकीच्या सुपीक कसदार तसेच सध्या राबत असलेल्या भात शेती पर्यावरण समृद्ध असलेल्या शेतजमिनी राजकीय पुढारी आणि सरकारी अधिकारी यांनी शेतकऱ्यांचा विरोध डावलून फसवणूक केली असुन सन 2006 पासून शेतकऱ्यांचा तीव्र विरोध असताना जबरदस्तीने केलेले भूसंपादनाविरोधात शेतकऱ्यानी अखेर हताश होऊन आत्महत्येचा इशारा दिला आहे . एमआयडीसीने बळाचा वापर करून 25/02/25 रोजी करू पाहत असलेल्या शेत जमीन मोजणीला शेतकऱ्यांनी तीव्र विरोध दर्शवत मोजणी रद्द करण्यास प्रशासनाला भाग पाडले आहे . दरम्यान एमआयडीसीत जमीन खरेदी करणाऱ्या कारखानदारांनी व त्यांच्या बांधकाम ठेकेदाराने खाजगी अंगरक्षक बाउन्सर आणून व पोलीस प्रशासनाच्या खांद्यावर बंदूक ठेवून एमआयडीसीमधील जमीन मोजणी करण्याचा घाट घातला होता. मात्र अन्यायग्रस्त शेतकऱ्यांनी तसेच काकोळे गावचे सरपंच , उपसरपंच तसेच शेतकरी कल्याणकारी संस्था यांनी तीव्र विरोध केला आहे . व जोपर्यंत शेतकऱ्यांना विश्वासात घेतले जात नाही व योग्य मोबदला देऊन शेतकऱ्यांचे योग्य ते पुनर्वसन ध्येय धोरण राबवले जात नाही , सोबतच शासन निर्णयाप्रमाणे स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार व्यवसायात प्राधान्यक्रमाने समाविष्ट केले जात नाही तोपर्यंत हे भूसंपादन शेतकऱ्यांना मान्य नाही. यावेळी शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री रमेश पाटील व बंदोबस्तास असलेले पोलीस बांधव तसेच एमआयडीसीचे भूमापक महेश डोंगरे उपस्थित होते. त्यावेळी अन्यायग्रस्त शेतकऱ्यांनी भविष्यात जर शेतकऱ्यांना न्याय मिळाला नाही तर नैराश्यातून शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यास त्याला एमआयडीसी, शासन, प्रशासन, सर्वस्वी जबाबदार राहतील असा इशारा दिला आहे.

## सिमेंट मिक्सरमधून अवैद्य मद्याची वाहतूक 66 लाख 29 हजारांचे 595 खोके जप्त

**ठाणे, दि. २६ : प्रतिनिधी**



सिमेंट मिक्सरमधून गोवा राज्यात निर्मित अवैध मद्याची वाहतुक करणाऱ्याला राज्य उत्पादन शुल्क विभागाने केलेल्या कारवाईत अटक केली आहे. पथकाने सिमेंट मिक्सरमधून अवैध मद्याच्या बाटल्यांनी भरलेले ५९५ खोके जप्त केले आहेत. या प्रकरणी वाहन चालक मोहन जोशी याला अटक करण्यात आले असल्याची माहिती देण्यात आली. या कारवाईत वाहनासह हा एकूण ६६ लाख ३९ हजार १७५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

गोवा राज्यात निर्मित मद्याला बंदी आहे. असे असतानाही हा मद्याचा साठा छुप्या पद्धतीने राज्यात आणला जात असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या ठाणे, नवी मुंबई आणि कल्याण पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे, पथकांनी सीबीडी -डी.वाय. पाटील स्टेडियमच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावरील घाट रस्त्यात मंगळवारी मध्यरात्री गस्त घातली. पथकांची गस्ती सुरू असतानाच १० चाकी सिमेंट मिक्सर हे वाहन संशयास्पदरित्या येत असल्याचे पथकाला आढळून आले. त्यानंतर पथकाने ते वाहन अडविले. त्या वाहनाची पथकाने तपासणी सुरू केली. त्यावेळी वाहनाच्या मधील बाजूस असलेल्या मिक्सरचे झाकण उघडले असता, त्यामध्ये गोवा राज्यात निर्मित अवैध मद्याचा साठा आढळून आला. पथकाने वाहन ताब्यात घेतले. या वाहनातून अवैध मद्याच्या बाटल्या भरलेले एकूण ५९५ खोके आढळून आले. दारुबंदी गुन्ह्यांतर्गत पथकाने वाहन जप्त केले. वाहनासह हा एकूण ६६ लाख ३९ हजार १७५ रुपयांचा मुद्देमाल असल्याचे राज्य उत्पादन शुल्क विभागाने स्पष्ट केले. याप्रकरणाचा पुढील तपास ठाणे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक प्रवीण तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथकाचे निरीक्षक महेश धनशेट्टी करत आहेत.

## उल्हासनगर महापालिकेच्या अभय योजनेला चांगला प्रतिसाद

**उल्हासनगर, दि. २६ : प्रतिनिधी**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासक तथा आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी दिलेल्या निर्देशानुसार उल्हासनगर महानगरपालिके अंतर्गत अंतिम अभय योजना 2024-25 लागू करण्यात आली असुन या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे सहायक आयुक्त अजय साबळे यांनी सांगितले.

उल्हासनगर महापालिकेच्या आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी मालमत्ताकरात सुट मिळावी म्हणुन अभय योजना लागू केली आहे . तेव्हा अभय योजनेच्या पहिल्याच दिवशी रु.2, 69, 94, 642/- एवढी वसुली झाली आहे. सदर अभय योजनेस नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याने या योजनेच्या माध्यमातुन २०० कोटीचे टार्गेट पुर्ण होण्याची शक्यता वर्तवन्यात येत आहे.

सदर अभय योजनेच्या अनुषंगाने मालमत्ता कर भरणा वाढीसाठी अतिरिक्त आयुक्त किशोर गवस यांच्या मार्गदर्शनखाली काल उल्हासनगर महापालिका मुख्यालया मध्ये सर्व कर निरीक्षक आणि वसुली लिपिक यांची बैठक आयोजित करुन त्यांना मालमत्ता कर वसुली बाबतच्या सुचना देण्यात आल्या आहेत. सदर बैठकीला उपायुक्त विशाखा मोटघरे, सहायक आयुक्त (कर ) अजय साबळे, कर निर्धारक व संकलक निलम कदम व इतर अधिकारी उपस्थित होते.

## मुंबई पोर्ट ट्रस्ट एससी, एसटी आणि ओबीसी वेल्फेअर असोसिएशनच्या नवीन कार्यालयाचा उद्घाटन सोहळा

**मुंबई, दि. २६ : प्रतिनिधी**

कर्नाक बंदर येथील मुंबई मुंबई पोर्ट ट्रस्टच्या श्रमिक भवनमध्ये २० फेब्रुवारी २०२५ रोजी मुंबई पोर्ट ट्रस्ट एस् सी एस् टी आणि ओबीसी वेल्फेअर असोसिएशनच्या नविन कार्यालयाचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला. कार्यालयाचे उद्घाटन ज्येष्ठ कामगार नेते व मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉइज युनियनचे अध्यक्ष अ‍ॅड. एस. के. शेट्ये, मुंबई बंदर एस सी एस टी आणि ओबीसी वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.सुरेश माने, ऑल इंडिया मेजर पोर्ट एस सी एस टी एम्प्लॉइज फेडरेशनचे अध्यक्ष अ‍ॅड. अंकुश कांबळे, असोशिएशनचे सरचिटणीस संजीवन थोरावडे तसेच मुंबई बंदर प्राधिकरण बोर्ड मेंबर प्रदीप नलावडे आणि ज्ञानेश्वर वाडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मुंबई पोर्ट ट्रस्ट पेन्शनर्स असोसिएशनचे अध्यक्ष सी. जे. मेंडोन्सा, फ्लोटिला वर्कर्स युनियनचे सेक्रेटरी उदय चौधरी, एम बी पी टी डॉक्स अँड जनरल एम्प्लॉइज युनियनचे जनरल सेक्रेटरी सुधाकर अपराज, एम बी पी टी डॉक्स अँड जनरल एम्प्लॉइज युनियनचे सेक्रेटरी विजय रणदिवे, ट्रान्सपोर्ट अ‍ॅन्ड डॉक्स वर्कर्स युनियनचे सेक्रेटरी बबन मेटे, बापू घाडीगावकर आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते. तसेच असोसिएशनचे कार्याध्यक्ष गिरीश कांबळे, अशोक वडगांवकर व खजिनदार प्रदीप नवरे हे उपस्थित होते .मुंबई बंदर प्रशासनातील वरिष्ठ उप मुख्य चिकित्सा अधिकारी डॉ. दर्पणा पटेल, उप मुख्य चिकित्सा अधिकारी डॉ. सोनल हिरभगत, वरिष्ठ उप मुख्य लेखाधिकारी प्रीतम राव, वरिष्ट उप मुख्य अभियंता कारदेकर, उप मुख्य अभियंता सोनकुसळे, उप मुख्य विधी अधिकारी ॲड. अनिल बोडके, वरिष्ठ संपदा अधिकारी महेश मोहिते, वरिष्ठ प्रशासनिक अधिकारी सतीश जाधव, लेखा अधिकारी आय. बी. चौधरी , मुख्य यांत्रिकी विभागाचे निर्मल, सुभेदार, कॅटरिंग अधिकारी कणसे तसेच कुटुंब कल्याण अधिकारी नागनाथ घाडगे उपस्थीत होते. यानंतर मान्यवरांकडून छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतिबा जोतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. सर्व मान्यवरांचा असोसिएशनतर्फे शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी असोसिएशनचे सर्व आजी माजी वरिष्ठ, पोर्ट सेवेत असणारे पदाधिकारी, सभासद ,कर्मचारी उपस्थित होते. गायक कलाकारांनी उद्घाटन् सोहळा सुरू होण्यापूर्वी आपल्या सुमधुर गाण्यांनी जमलेल्या श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

## कपिल ढोले यांची लोनाड सेवा सहकारी सोसायटी सभापती पदी बिनविरोध निवड



**भिवंडी, दि. २६ : प्रतिनिधी**

भिवंडी तालुक्यातील लोनाड ग्रुप विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी सभापती पदी मंगळवारी कपिल बळीराम ढोले यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.कपिल ढोले यांच्या निवडीनंतर त्यांना शुभेच्छा देण्यासाठी देवा ग्रुप फाउंडेशनचे सचिव तानाजी भाऊ मोरे आणि सुधीर पाटील,यशवंत सोरे यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी कपिल ढोले यांना पुष्पहार अर्पण करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यावेळी सोसायटीचे संचालक माजी सभापती पंडित देऊ पाटील,उपसभापती मीराबाई बाळाराम गायखे,संचालक पांडुरंग गोविंद पाटील,श्रीराम सुनुर जाधव,अरुण नामदेव पाटील,प्रशांत पुरुषोत्तम पाटील,संतोष तुकाराम तांबोळी,सुदाम गोविंद पाटील,तुकाराम विठ्ठल भोईर,किरण मंगल थळे,संचालिका वंदना पांडूरंग पाटील,तज्ञ संचालक कृष्णा नागो केणे,गुरुनाथ नामदेव पाटील,सचिव आदेश मारूती जाधव आदींची उपस्थिती होती.

महासागर ●गुरुवार,दि.२७ फेब्रुवारी २०२५

# अकोला

पान ३




## ग्रामीण भागातील धार्मिक स्थळाच्या विकासासाठी आमदार सावरकर यांचे विशेष प्रयत्न : खा. अनुप धोत्रे





▪अकोला,दि.२६ (प्रतिनिधी):
देशाचे माजी मंत्री भाजपचे जेष्ठ नेते मा संजय भाऊ धोत्रे यांच्या वाढदिवसानिमित्त महाशिवरात्री च्या पावनदिनी तीर्थक्षेत्र पानेट येथे भाजपाच्या विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

खासदार अनुप धोत्रे , आमदार रणधीर सावरकर , सौ मंजुषा सावरकर , सौ धोत्रे यांच्या हस्ते भुराघरातील स्वयंभु महादेवावर दुग्ध अभिषेक करून पूजा अर्चा करण्यात आली. येथे येणाऱ्या भावीकांसाठी आमदार सावरकर यांनी विशेष प्रयत्न करून उभारलेल्या २ कोटी ४८ लक्ष रुपयांच्या भव्य सभागृहाचे व स्वछता गृहाचे रणधीर सावरकर व खासदार अनुप धोत्रे यांच्या हस्ते लोकार्पण ही करण्यात आले. ग्रामीण भागातील धार्मिक स्थळाला भरभरून निधी देऊन त्यांचा अधिक प्रमाणात विकास व्हावा याकडे आमदार रणधीर सावरकर यांचे विशेष लक्ष असल्याचे मत खासदार अनुप धोत्रे यांनी यावेळी व्यक्त केले.

विकासापासून कोसोदूर राहिलेल्या या संस्थानला मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देत भक्तांच्या सोयीसाठी अकोला अकोट रोडवरून पानेटला जोडणाऱ्या रस्त्यासाठी तात्काळ १कोटी ७१ लक्ष रुपये मंजूर डांबरीकरन रस्ता करुन दिल्याबद्दल पानेट संस्थानच्या वतीने आमदार सावरकर व खासदार अनुप संजय धोत्रे यांच्या भव्य सत्कार करण्यात आला.अकोला जिल्ह्यात प्राचीन महत्व प्राप्त असेललं पानेट सारखं एवढं मोठं धार्मिक स्थळ असतानाही प्रकाशझोतात आलं नाही.

आणि विकासापासूनही वंचित राहिलं याची खन्त व्यक्त असल्याचे सांगत भाविकांच्या सोयीसाठी मी आमदार झाल्यापासून जवळपास ४ कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला आहे याची माहिती देत या पुढेही येथे येणाऱ्या भविकानासाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करत राहू अशी ग्वाही आमदार सावरकर यांनी हजारो भाविकाना दिली. महाशिवरात्री निमित्त दर्शनासाठी येणाऱ्या हजारो भाविकांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करून मोफत औषदोपचार करण्यात आला. तसेच प्रयागराज येथून आणलेल्या जलाचे सुद्धा भाविकांना वितरण करण्यात आले. साबुदाना उसळ वितरित करण्यात आली.

यावेळी भारतीय जनता पार्टीचे अकोला जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी , पानेट संस्थांनचे अध्यक्ष व सर्व पदाधिकारी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## २८ व्या अखिल भारतीय कार्यशाळेचे डॉ.पंदेकृवि मध्ये उद्घाटन!

▪अकोला,दि.२६ (प्रतिनिधी):
डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील अखिल भारतीय समन्वयीत संशोधन प्रकल्प, कृषी व कृषी आधारित उद्योगांसाठी ऊर्जा (AICRP on EAAI) द्वारा यावर्षी २८ व्या अखिल भारतीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून सदर कार्यशाळा २५ ते २७ फेबुवारी या तीन दिवसामध्ये संपन्न होत आहे. दिनांक २५ फेबुवारी रोजी सकाळी १० वाजता विद्यापीठातील समिती सभागृहामध्ये या तीन दिवसीय कार्यशाळेचे यशस्वीपणे उदघाटन करण्यात आले.

डॉ पंदेकृविचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांची प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या उदघाटन सत्राचे अध्यक्षस्थान डॉ. के. पी. सिंग (असिस्टंट डायरेक्टर जनरल, कृषी अभियांत्रिकी, भारतीय कृषी संशोधन परिषद, नवी दिल्ली) यांनी भूषविले तर डॉ. सी. आर. मेहता (संचालक, सेंट्रल इन्स्टिटयूट ऑफ ॲग्रिकल्चरल इंजिनीरिंग, भोपाळ), यांची विशेष अतिथी म्हणून उपस्थिती होती. डॉ. विलास खर्चे (संशोधन संचालक, डॉ. पंदेकृवि, अकोला ), डॉ. व्ही. के. भार्गव (प्रकल्प समन्वयक, अखिल भारतीय समन्वयीत संशोधन प्रकल्प), डॉ. सुरेंद्र काळबांडे (अधिष्ठाता, कृषी अभियांत्रिकी विद्याशाखा, डॉ. पंदेकृवि, अकोला ), डॉ. डी. बी. उंदीरवाडे (संचालक, विस्तार शिक्षण, डॉ. पंदेकृवि, अकोला ) व डॉ. मुरारी शाम (विषयतज्ज्ञ) यांची विचारमंच्यावर उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला माननीय कुलगुरू डॉ. शरद गडाख व डॉ. के. पी. सिंग यांचे सह सर्व मान्यवरांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले. यानंतर भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या गौरव गीतास सभागृहात सर्वांनी उभा राहून सन्मान दिला. यानंतर कार्यक्रमाची औपचारिकता म्हणून सर्व मान्यवरांचे शाल, श्रीफळ, व सन्मानचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले.

या तीन दिवसीय अखिल भारतीय कार्यशाळेमध्ये देशभरातील एकूण १७ संशोधन केंद्रांनी सहभाग घेतला होता. यामध्ये ७० शास्त्रज्ञांनी सहभाग नोंदवला होता. यामध्ये पंजाब ॲग्रिकल्चरल युनिव्हर्सिटी, लुधियाना (पंजाब), तामिळनाडू ॲग्रिकल्चरल युनिव्हर्सिटी, कोइंबतोर (तामिळनाडू), सरदार पटेल रिनिव्हेबल एनर्जी रिसर्च इन्स्टिट्यूट, वल्लभ विद्यानगर (गुजरात), हिसार ॲग्रिकल्चरल युनिव्हर्सिटी (हरियाणा), महाराणी प्रताप ॲग्रिकल्चरल युनिव्हर्सिटी, उदयपूर (राजस्थान), बेंगळुरू रिसर्च स्टेशन (कर्नाटक), कोर्टालूम रिसर्च स्टेशन (तामिळनाडू), सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ ॲग्रिकल्चरल इंजिनीरिंग, भोपाळ (मध्यप्रदेश), युनिव्हर्सिटी ऑफ ॲग्रिकल्चरल सायन्सेस धारवाड (कर्नाटक), इंडियन ॲग्रिकल्चरल सायन्सेस रिसर्च इन्स्टिटयूट (नवी दिल्ली), तसेच पंतनगर, कट्टक, रायचूर ॲग्रिकल्चरल युनिव्हर्सिटी इत्यादी चा समावेश होता. विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विलास खर्चे यांनी स्वागतपर भाषण करताना उदघाटन प्रसंगी आलेल्या सर्वांचे शब्दसुमनांनी स्वागत केले. पुढे बोलताना त्यांनी डॉ. पंदेकृवि अंतर्गत संशोधन कार्याबाबत उपस्थितांना माहिती देतांना डॉ. पंदेकृवि मार्फत देश व विदेश पातळीवर प्रसिद्ध असलेल्या पीकेव्ही मिनी दाल मिल चा आवर्जून उल्लेख केला. तसेच या विद्यापीठामार्फत मागील पाच वर्षांमध्ये प्रकाशित केल्या गेलेल्या अनेक संशोधन पत्रांचा उल्लेख केला.

## गायरान जमिनीचे पट्टे व झोपडपट्टी धारकांना घरकुलासाठी सोमवारी धरणे आंदोलन

▪अकोला,दि.२६ (प्रतिनिधी):
दि.०३.०३.२०२५ रोजी अकोला जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी ११ वा. आंदोलन धरणे अकोला जिल्हयातील सर्व गायरानधारकांना त्यांच्या जमिनीचे कायम पट्टे मिळणेसाठी तसेच सरकारी जागेम ध्ये ३० ते ४० वर्षापासून राहत असलेल्या लोकांना त्यांच्या नावे ८ अ नमुना ड नुमना नसल्यामुळे त्यांना शासनाच्या घरकुलाचा लाभ मिळालेला नाही.

तसेच सरकारी गायरान जमिनीमध्ये ३० ते ४० वर्षापासून वहिती करून त्यावर पिके घेत आहेत. महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग शासन परिपत्रक क्र. एलईएल २८११९१ शासन निर्णय दि.२२.०४.१९९२ दि. १४ एप्रिल १९९० मध्ये अस्तित्वात असलेली अतिक्रमणे नियमनाकुल करण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी तात्काळ सुनावणी करून अतिक्रमणधारकांना त्यांच्या नावे नियमाप्रमाणे तात्काळ कारवाई करून त्यांना त्यांचे नावे ७/१२ करून कायम पट्टे देण्यात यावे तसेच झोपडपट्टी धारकांच्या बाबत महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय टीपीएस २०१९ दि.२७/०८/२०१९ नुसार सरकारी जागा त्यांचे नावे करून त्यांना त्वरीत घरकुल मंजूर करून त्याचा लाभ द्यावा. यासाठी शिवसेना शिंदे अकोला जिल्हा प्रमुख मागासवर्गीय विभाग तथा डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भुषण पुरस्कार जे.पी. सावंग यांच्या नेतृत्वामध्ये तसेच विदर्भ प्रमुख भाई सावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. मा. शिवसेना प्रमुख ना. एकनाथरावजी शिंदे साहेब उपमुख्य मंत्री तथा नगरविकास मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनात जिल्हाधिकारी यांना योग्य ते निर्देश देवून गोरगरीबांना न्याय मिळून देतील आपले न्याय व हक्क मिळून घेण्यासाठी धरणे आंदोलनामध्ये आपल्या सर्व कागदपत्रासह सहभागी व्हावे असे आवाहन अकोला जिल्हा प्रमुख जे. पी. सावंग, अकोला महानगर अध्यक्ष ॲड अमोल गवई, कार्याध्यक्ष बाळासाहेब दामोदर, सचिव रविभाऊ जंजाळ यवतमाळ जिल्हानिरिक्षक जेष्ठ नेते यशवंतराव दांडगे महानगर प्रमुख डी. जे. वानखडे मागासवगीय महिला जिल्हाध्यक्षा शैला झगडे, सेवकराम हेलोडे पत्रकार जयप्रकाश वाहुरवाघ जितेन्द्र इंगळे, बाबुराव सदावर्ते, सुदाम तायडे, गजानन बोदडे, भाऊराव वानखडे, गजान तायडे, बशीर पहेलवान आपण धरणे आंदोलासाठी हजर राहावे असे आवाहन करण्यात ये आहे.

## ज्ञानेश्वरी गीतेचा सुंदर अलंकार आहे.! : ज्ञानेश्वर शिंदे माऊली

### गुरुमाऊली जयंती महोत्सव श्री ज्ञानेश्वरी भावकथा-पुष्प ३ रे


▪अकोट,दि.२६ (प्रतिनिधी):
ज्ञानेश्वरी हा गीतेचा सुंदर अलंकार आहे.ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायात वेधशास्त्राचा अवघा सार सामावलेला आहे पहिल्या दहा ओव्यामध्ये तर सदुरूंचे यथार्थ वर्णन सुंदरतेने केलेले आहे. माऊलींनी सद्गुरुंना परमात्म्याची उपमा देऊन देव आणि सद्गुरु यात भेद नाही तर संत आणि देव एकच आहेत नव्हे नव्हे संत हे देवा पेक्षाही श्रेष्ठ आहेत. निष्काम भक्तीच्या माध्यमातून या देवाजवळ सहज जाता येते. भक्तीत भाव हवा आणि भावनेत विवेक हवा. या विवेकाला वैराग्याची जोड दिली तर मोक्ष प्राप्त झाल्याशिवाय



राहत नाही अशा आशयाचे मौलिक चिंतनीय विचार श्री ज्ञानेश्वरीचे प्रख्यात चिंतक हे.भ.प. श्री ज्ञानेश्वर महाराज शिंदे माऊली यानी मांडले. संत वासुदेव महाराज यांच्या १०८ व्या जयंतीनिमित्त श्रीक्षेत्र श्रद्धासागर येथे आयोजित श्री ज्ञानेश्वरी भाव कथेचे तिसरे पुष्प गुंफतांना शिंदे माऊली बोलत होते. आपल्या रसाळ व सहज वाणीतून श्रोत्यांना मंत्रमुग्ध करीत ते पुढे म्हणाले. वारकरी संप्रदाय सर्वश्रेष्ठ असून सगुण आणि निर्गुण भक्ती करणारा आहे. भक्ती करणारा सादक हा प्रबळ असला पाहिजे. बलवान असला पाहिजे. शारीरिक व बौद्धिक बळासोबतच वैराग्य व निश्चयाचे बळ. ज्ञानार्जनाचे बळ फलद्रूप होते. भावना आहे पण विवेक नसेल तर ती दिशाहीन ठरेल. भक्ती,भाव, विवेक आणि वैराग्य हे सद्गुरु संतांच्या ठिकाणी आहे आणि म्हणून त्यांचा निश्चय कधी ढळत नाही. सद्गुरु हे आपल्या भक्तांना अमंगळ, अज्ञान, दुःख ,अहंकारा पासून दूर ठेवतात. वेद,शास्त्राच्या वृक्षाला आलेलं फळ म्हणजे सद्गुरु होत. ते जन्म मृत्यूच्या पलीकडे असतात. संत हे न विझणारा लख्ख प्रकाश देणारा दिप आहेत. या दीपज्योतीने आपली ज्योत प्रज्वलित करून जीवन उजळून टाका अन धन्य व्हा असा हितोपदेश शिंदे माऊलींनी शेवटी केले. आपल्या अमृतवाणीने त्यांनी भाविक स्वर त्यांना मंत्रमुग्ध केले.भाव कथेला मोठ्या संख्येने भाविक श्रोते उपस्थित होते.

## शास्त्र सिद्धांत पचवून निर्माण झालेले काव्य गाथा : श्री ज्ञानेश्वर महाराज वाघ

▪अकोला,दि.२६ (प्रतिनिधी):
सामान्यतः आपण ज्याप्रमाणे फ़ुटाणे किंवा



शेंगदाणे खाऊन पचवू शकतो त्याप्रमाणे सुकामेव्यातील बदाम आधी पदार्थ सहज खाऊन पचविनाची क्षमता आपल्या जठरात नसते. त्याकरिता त्या पौष्टिक पदार्थांवर आधी रात्रभर पाण्यात भिजवून तदनंतर साजूक तुपाबरोबर परतवून घेत त्याचा स्वादिष्ट शिरा बनवून खावा लागतो तरच तो पचत असतो.

लहान बालकांना तर तो शिरा सुद्धा पचत नाही त्याकरिता त्याची माता तो स्वतः खाऊन पचविते आणि त्याचे दुधात रूपांतरण करून तद्वारा त्या बालकाचे योग्य रीतीने पोषण करीत असते. तद्वत वेदशास्त्रादी संस्कृत प्रचुर ग्रंथातील तत्त्वज्ञान हे बदाम बिजाप्रमाणे पौष्टिक तर आहे परंतु सहज पाचक मात्र नाही. म्हणूनच जगद्गुरु तुकाराम महाराजांसारख्या मातृहृदयी संतांनी ते तत्वज्ञान आधी स्वतः पचविले व अभंग रुपी दुधाच्या द्वारा ते स्वमुखातून निश्रृत करून तुम्हाला सर्वसामान्यजना करिता शब्दबद्ध करून ठेवले. म्हणून त्यांची अभंग वाणी हे शास्त्र सिद्धांत पचवून निर्माण झालेले लोकोद्धारक महाकाव्य आहे. असे अभ्यासपूर्ण मत भागवताचार्य ज्ञानेश्वर महाराज वाघ यांनी व्यक्त केले.

ते आज श्री संत वासुदेव जी महाराज स्मृती मंदिर श्री ज्ञानेश आश्रम श्रीक्षेत्र वारी भैरवगढ येथे आयोजित गाथा पारायण तथा प्रवचन ज्ञानयज्ञ सप्ताहातील चतुर्थ पुष्प गुंफ़ित असतांना बोलत होते. ते पुढे म्हणाले की, जे ना देखील रवी ते देखील कवी असा मराठीमध्ये वाक्प्रचार असून , जगद्गुरु तुकोबाराय हे नुसते कवी नसून अनुभवी असल्यामुळे जे ना देखे कवी ते देखे अनुभवी असे म्हणावे लागेल. म्हणून वैकुंठवासी मामासाहेब दांडेकर गाथेला तुका पंचम तो वेद असे सार्थपणे संबोधायचे . तसेच संपूर्ण संप्रदाय गाथेला तुकोपनिषद् या नावाने गौरवान्वित करीत असतो. ज्यांना बेरीज करता येते त्याला संपूर्ण गणित येथे असे म्हणता येत नाही कारण गणितात फ़क्त बेरीजच नाहीत वजाबाकी, गुणाकार, भागाकार आदींचाही त्यात समावेश असतो . तद्वत नुसते यमक जोडता आले म्हणून कवी आणि कवित्व करता येते म्हणून संत असे म्हणता येत नाही. तर कवित्व हे अनुभवपूर्ण , उद्बोधक , वास्तववादी व परतत्वस्पर्शी असावी लागते. हे सर्वच गुण एकत्रितरित्या संत वांङ्मयाव्यतिरिक्त इतरत्र कुठेही पाहण्याकरिता मिळत नाही. असे अनेक तौलनिक उदाहरणांद्वारे महाराजांनी पटवून दिले.

## लोकशाही सभागृहात साजरा होणार मराठी भाषा गौरव दिन

▪अकोला,दि.२६ (प्रतिनिधी):
जिल्हाधिकारी कार्यालयातील लोकशाही सभागृहात उद्या दि. २७ फेब्रुवारी रोजी दु. ४ वाजता मराठी भाषा गौरव दिना निमित्त 'मराठी भाषा संवर्धन काळाची गरज' या विषयावर व्याख्यान कार्यक्रम होणार आहे. ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कवी कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवसानिमित्त शासनातर्फे मराठी भाषा गौरव दिन साजरा केला जातो. या कार्यक्रमाला अधिकारी, कर्मचारी, नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



## मराठा पाटील संघ बाळापूरचा वधू वर परिचय मेळावा संपन्न

▪अकोला,दि.२६ (प्रतिनिधी):
मराठा पाटील संघ तालुका बाळापूर यांच्यावतीने भय्यूजी महाराज आश्रम निमकर्दा येथे उपवर वधू वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला. बाळापुर तालुक्यातील उपवर मुला मुलींनी सह परिसरातील पाचशेवर उपवर वधु वर परिचय पत्र या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आले. वधु वर परिचय मेळाव्यात उपस्थित शेकडो उपवर मुला मुलींनी आपला परिचय देऊन आपल्या अपेक्षा उपस्थित मान्यवरांसमोर विशद केल्या.

मराठा पाटील संघ तालुका बाळापूरचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक राजदत्त मानकर यांच्या अपघाती निधनानंतर सदर नियोजित वधु वर परिचय मेळावा अत्यंत साध्या पद्धतीने संपन्न झाला. कार्यक्रमा आरंभी प्राध्यापक राजदत्त मानकर गुरुदेव सेवा मंडळाचे प्रभारी गुरुवर्य बलदेवराव पाटील,तुकाराम बिडकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शिव प्रतिमा राजमाता जिजाऊ तसेच संत गाडगे महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रतिमांचे पूजन करून पुष्पांजली अर्पण करण्यात आली. संघटनेच्या वतीने मराठा पाटील संघटना



करीत असलेल्या कार्याचा व आगामी कार्यक्रमाबाबत चा अहवाल उपस्थित समाज बांधवांमुळे सादर करण्यात आला.

कार्यक्रमास बाळापुर तालुक्यासह परिसरातील मराठा पाटील संघटनेचे सदस्य व समाज धुरीण तसेच समाजातील सर्व घटक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमास महिला वर्गाची उपस्थिती लक्षणीय होती, या वधू वर परिचय मेळाव्याचे संपूर्ण व्यवस्था बाळासाहेब ताथोड, प्रशांत ताथोड,देवानंद साबळे यांचे सह निमकर्दा गाव व परिसरातील मराठा पाटील संघटनेच्या सभासदांनी केल. मेळाव्यात प्रामुख्याने खासदार अनुप धोत्रे, कृष्णा भाऊ अंधारे, अशोक अमानकर अशोकराव पटोकार संजय राऊत रेखाताई राऊत अनिल राऊत राजेश नलकांडे सुनील गोरे नानाराव ठाकरे गुलाबराव ठाकरे गणेशराव घोगरे शिवदास मानकर,छायाताई मानकर, उद्धव धुमाळे संदीप दादा पाटील विठ्ठलराव माळी ज्योतीताई टाले सुनीता ताई ताथोड रमेश भाऊ ठाकरे मंचितराव पोहरे ,रामदास वानखडे प्रशांत पोहरे राजेश खुमकर अस्थिरोग तज्ञ डॉक्टर मेटांगे डॉक्टर हर्षवर्धन मालोकार गोपाल भाऊ उगले ,नीलकंठ साबळे,वारुळकर गुरुजी,पाथरीकर सर,सुधाकर येवलेजगदीश हागे अजय ताथोड रवींद्र पोहरे शिवाजी म्हैसणे ,विपुल घोगरे विठ्ठलराव मेटांगे प्रामुख्याने उपस्थित होते मराठा पाटील समाजातील सर्व घटकांपर्यंत आयुष्यमान भारत कार्ड पोचविण्याकरिता संघटनेचे अशोकराव नळकांडे यांनी सदर कार्ड काढून देण्या करिताचे व्यवस्था उपलब्ध करून दिली होती येथे १७६ पेक्षा अधिक समाज बांधवांनी आयुष्यमान भारत कार्ड काढले

## रामदेवबाबा-श्यामबाबा मंदिरात सातव्या प्राणप्रतिष्ठा महोत्सवचे आयोजित

### भजन संध्या, सुंदरकांड, नृत्य नाटक व श्याम उत्सवाची राहणार रेलचेल

▪अकोला,दि.२६ (प्रतिनिधी):
परंपरेनुसार यावर्षी देखील गीता नगर परिसरातील रामदेवबाबा-श्यामबाबा मंदिरात मंदिराचा सातवा प्राणप्रतिष्ठा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. सात वर्षांपूर्वी मंदिरात प्राणप्रतिष्ठा उत्सव भव्य आणि दिव्य पद्धतीने साजरा करण्यास सुरुवात झाली. राजस्थान आणि संपूर्ण भारतात श्रद्धा,भक्ती आणि श्रद्धेने पूजले जाणारे भगवान विष्णूचे कलियुगातील अवतार श्री बाबा रामदेव आणि खाटू श्याम येथे विराजमान असलेले श्याम बाबा आणि हनुमानजी यांची मूर्ती या मंदिरात स्थापित करण्यात आली. गेल्या सात वर्षांपासून भाविकांच्या अपार भक्तीमुळे, स्थानिक आणि बाहेरील भाविक या मंदिरात मोठ्या संख्येने दर्शनासाठी येतात. रामदेवबाबा, श्यामबाबाचे सर्व उत्सव व हनुमान जन्मोत्सवासह हनुमान जयंती देखील साजरी केली जाते. वर्षभर विविध भाविक दर महिन्याला तीन ते चार वेळा भजन आणि कीर्तन उत्सव साजरा करतात. दरवर्षी भादवा शुक्ल दुज ला श्री रामदेव बाबांचा मोठा उत्सव साजरा केल्या जातो.

विशेष तिथीस भजन कीर्तन जागरण साजरे केले जाते. वर्षभरात मंदिरात सुशील बजाज हैदराबाद यांचे जम्मा जागरण, इतर प्रसिद्ध कलाकारांचे भजने होत राहतात. यासोबतच खाटू शाम श्री श्याम बाबांचा उत्सव, कार्तिक शुद्ध एकादशीला प्रगट जन्मोत्सव, फ़ाल्गुन सुदी ग्यारस एकादशीला उत्सव मंदिरात मोठ्या थाटामाटात साजरा




केला जातो. दर महिन्याला सुदी ग्यारस एकादशीला राणी सती धाम ते श्याम बाबा मंदिरापर्यंत श्यामबाबा ची भव्य निशाण यात्रा काढली जाते. या सर्व कार्यक्रमांची माहिती भक्तांना नियमितपणे दिली जाते. सर्व उत्सव आणि कार्यक्रमांना स्थानिक आणि दूरदूरच्या भाविकांकडून नियमितपणे पूर्ण सहकार्य मिळते. राधाकृपा भजन मंडळाकडून दर महिन्याच्या १५ तारखेला मंदिरात भजन संध्या आयोजित केली जाते. सर्व भक्तांच्या अपार भक्ती, श्रद्धेमुळे आणि मदतीमुळे सर्व कार्यक्रम यशस्वी होतात. कलियुगातील दोन्ही अवतारांच्या भक्तांना चमत्कारांच्या प्रत्यक्ष अनुभवाच्या स्वरूपात त्यांच्या इच्छा पूर्ण होत राहतात. लाखो भक्तांना याचा पुरावा मिळाला आहे.या शृंखलेत मंदिराचा सातवा प्राणप्रतिष्ठा महोत्सव यावर्षी १ मार्च २०२५ रोजी फ़ाल्गुन सुदी दुजेला साजरा होत असून यात मंदिर सुंदरपणे सजवले जात असून विशेष सजावट कलाकार रंगीबेरंगी विद्युत रोषणाई करणार आहेत. या दिवशी संध्याकाळी ७ वाजता, भजन गायक उमेश शर्मा डब्बू आणि कु. नेतल शर्मा यांनी भव्य भजन संध्याचे आयोजन केले आहे. ४ मार्च रोजी संध्याकाळी ७ वाजता राम दरबार सुंदरकांड गुप सुंदरकांड गुप सादर करणार आहे.शनिवार दि ८ आणि रविवार दि ९ मार्च रोजी सौ निधी मंत्री आणि इंदूर येथील कलाकारांचे नृत्यनाट्य आणि भजन संध्या होणार आहे.दि १० मार्च रोजी सकाळी ८ वाजता राणी सती धाम ते मंदिरापर्यंत शेकडो भाविकांसह श्याम बाबांची पायी निशान यात्रा आयोजित करण्यात आली आहे.आरतीनंतर ही निशाण यात्रा संपेल. सायंकाळी ७ वाजता इंदूरच्या प्रसिद्ध गायिका गौरी अग्रवाल यांच्या श्यामबाबांच्या भव्य भजन संध्याचे आयोजन करण्यात आले .

## चालत्या ट्रकसमोर तरुण झोपला मोठा अनर्थ टळला वाडेगाव बसस्थानकावरील घटना

**अकोला** : बाळापुर तालुक्यातील वाडेगाव बसस्थानकावरील चालत्या ट्रकसमोर अचानक तरुण झोपल्याची घटना मंगळवारी संध्याकाळी साडेपाच वाजताच्या सुमारास घडली, ट्रक चालकाच्या सतर्कतेमुळे तरुण बाल बाल बचावला मंगळवारी संध्याकाळी ट्रक बाळापूरहून पातूरकडे जात असताना अचानक एक तरुण चालत्या ट्रकच्या अवघ्या काही फुटा अंतरावर अचानक झोपला परंतु ट्रकचालकाने वेळेस ब्रेक करून ट्रक थांबविल्याने मोठा अनर्थ टळला आहे. वाडेगाव येथे बसस्थानकावर दररोजी वाहतुकीची कोंडी होत असल्याचा प्रकार घडत आहे. मात्र अशा वर्दळीच्या ठिकाणी वाहतूक पोलीस असणे गरजेचे आहे परंतु वाडेगाव बसस्थानकावर अद्यापही वाहतूक पोलीस फिरकत नसल्याचा आरोप वाहनधारकाकडून केला जात आहे. बाळापुर तालुक्यातील वाडेगाव येथे मोठी बाजारपेठ असल्याने बसस्थानकावर रात्रंदिवस वाहतुकीची वर्दळ असते, या ठिकाणी वाहतूक पोलीस असणे गरजेचे आहे. परंतु वाहतूक पोलीस किंवा वाडेगाव चौकीतील पोलीस कर्मचारी अद्यापहीफिरकत नसल्याने अपघातातदिवसेंदिवस वाढ होत आहे.

## शिवबाबा जयंती आत्मसंतोष भवन कडुन शिवबाबा जयंती मिरवणूक

### ८९ शिवबाबा जयंती आत्मसंतोष भवनमध्ये अमरनाथ पींडी दर्शन देखावा पर साजरी



▪हिवरखेड,दि.२६ (प्रतिनिधी):
प्रजापीता ब्रम्हाकूमारी ईर्श्वरीय विश्वविद्यालय द्वारा संचालित हिवरखेड ओमशांती सेटर आत्मसंतोष भवन येथे शिवबाबाची८९ वी जयंती ४३ वर्ष पुर्ण झालेल्या गितापाठशालेच्या आत्मसंतोंष भवनमध्ये ध्वजारोहन प्रमूख अतीथी रमेश दुंतोडे यांचे हस्ते व भागवतकार हभप श्रीमती हर्षाताई अनंत गेबड, किरण सेदाणी गजानन कराळे महेद्र भोपळे मुख्याध्यापीका प्रमिला मानकर सौ. दिपाली तिडके यांचे व मुख्यसंचालीका ब्रम्हाकूमारी रश्मीदिदी यांचे प्रमूख ऊपस्थीतीत पार पडले.यावेळी महाशिवरात्री निमित्त शिवमय झालेले अमरनाथ निवासी पींडी दर्शन व भगवान शंकरजी वेषभूशेतील मानवकृतीची मिरवनूक ब्रम्हाकुमारी रश्मिदिदी जेष्ठ शिवबाबाभक्त देविदास डांगे यांचे अधिपत्याखाली शांततेचे प्रतीक असलेल्या शूभ्रवस्त्र परिधान केलेल्या शिवभक्ता कदून काढन्यात आली.

शिव पालखी मधील शिवबाबा पींडि दर्शनाचा गावकऱ्यांनी मिरवणूक मार्गात लाभ घेतला रस्त्यावर शिवबाबा रथाचे स्वगातासाठी रांगोळी काढल्या होत्या.

RNINO-46973/1986 महासागर अकोला
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्क्वेअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक पुरुषोत्तम ढोले फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्क्वेअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम बोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीत पारदर्शकतेचा अभाव!

भारतीय निवडणूक आयोग ही एक स्वायत्त घटनात्मक संस्था आहे. संविधानाने कलम ३२४ अन्वये भारतीय निवडणूक आयोगाची निर्मिती केली. देशातील निवडणुकींसाठी निवडणूक आयोग सर्वस्वी जबाबदार असतो. निवडणुका निपक्ष, मुक्त वातावरणात, सर्वांना समान संधी, पारदर्शक या न्यायानुसार घेण्याची जबाबदारी घटनेने निवडणूक आयोगावर टाकली आहे.

अनेक दृष्टीने निवडणूक आयोगाची भूमिका ही निर्णायकी ठरते. मात्र ,गेल्या काही वर्षांपासून निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर मोठेच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, निवडणूक आयोग हा जणू सत्ताधारी पक्षासाठी काम करत आहे. म्हणूनच निवडणूक आयोगातील वादविवाद, सुंदोपसुंदी अनेकदा चव्हाट्यावर आली आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त पदावर झालेली ज्ञानेश कुमार यांची नियुक्ती अपेक्षेप्रमाणे मोठ्या वादाला कारणीभूत ठरली आहे. मुख्य निवडणूक आयुक्तांच्या निवड प्रक्रियेवर यापूर्वीही अनेकदा वाद झाले आणि न्यायालयीन हस्तक्षेपही झाले आहेत.

अगदी प्रारंभी निवडणूक आयोग एकसदस्यीय होता आणि राष्ट्रपती पंतप्रधानांच्या शिफारशीनुसार निवडणूक आयुक्तांची नियुक्ती करीत असत. पुढे १९८९ मध्ये निवडणूक आयोग त्रिसदस्यीय बनविण्यात आला आणि मुख्य निवडणूक आयुक्त व इतर दोन निवडणूक आयुक्त अशी रचना करण्यात आली.

त्यानंतर १९९० मध्ये आयोग पुन्हा एकसदस्यीय करण्यात आला होता; पण १९९३ मध्ये पुन्हा त्रिसदस्यीय आयोगाची रचना करण्यात आली आणि ती आजतागायत कायम आहे. अर्थात, त्यानंतरही तीनही आयुक्तांच्या नियुक्तीचे अधिकार राष्ट्रपती म्हणजेच पर्यायाने पंतप्रधानांकडेच होते. मार्च २०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप करत, निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसाठी निवड समिती असावी आणि त्यामध्ये पंतप्रधान, लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि सरन्यायाधीश यांचा समावेश असावा, असे निर्देश दिले. निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेला बळकटी देणे हा सर्वोच्च न्यायालयाच्या त्या निर्णयाचा उद्देश होता.


अ‍ॅड. दत्तात्रय फडतरे

लोकसभा निवडणुका जाहीर होण्याच्या तोंडावर अगदी अनपेक्षितपणे निवडणूक आयुक्त अरुण गोयल यांनी वैयक्तिक कारण देऊन राजीनामा दिला. त्यानंतर विशेष म्हणजे याच अरुण गोयल यांनी नोव्हेंबर २०२२ मध्ये त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली आणि दुसऱ्याच दिवशी केंद्र सरकारने त्यांची निवडणूक आयुक्तपदी नियुक्ती केली.

मात्र इतक्या घाईगर्दीने त्यांची नियुक्ती केली गेली म्हणून वाद सर्वोच्च न्यायालयात गेला. इतक्या जलदगतीने त्यांच्या नियुक्तीच्या फाईलचा प्रवास झाला की न्यायालयाने आश्चर्य केले आणि सरकार आपल्या मर्जीनुसार निवडणूक आयुक्त नेमत असेल तर तो आयुक्त पंतप्रधानांना, सरकारला कसा प्रश्न विचारणार अशी टिप्पणी केली होती.

मे २०२३ मध्ये निवडणूक आयुक्त नियुक्तीबाबत संसद कायदा करत नाही तोपर्यंत पंतप्रधान, विरोधी पक्षनेते आणि देशाचे सरन्यायाधीश यांची समिती निवड करेल असे आदेश दिले, अर्थातच ते सरकारला सोयीचे नव्हते , म्हणून केंद्र सरकारने घाईघाईने कोणाशीही चर्चा न करता निवडणूक आयुक्तांची नियुक्ती, कालावधी याबाबत विधेयक मंजूर करून केले.

निवडणुक आयोगाच्या सदस्य नेमणुकीसाठी काही काळ आवश्यक मानली जाणारी सरन्यायाधीशांच्या संमतीची अट कायदा करून काढून टाकली. सरन्यायाधीश, विरोधी पक्षनेता आणि पंतप्रधान अशी त्रिसदस्य समिती या पदांवरील निवड करत असे. बहुमताच्या जोरावर केंद्राने कायदा करून यातील सरन्यायाधीशांची आवश्यकता दूर केली आणि त्याजागी मंत्री नेमण्याचा निर्णय घेतला. म्हणजे आता निर्णय दोन विरुद्ध एक असा होईल, हे निश्चित. कारण कोणत्याही मंत्र्यांची काय हिंमत तो पंतप्रधानांस विरोध करेल ! तेव्हा यापुढे नेमणुका कशा होतील, हे स्पष्ट आहे.

या समितीतून सरन्यायाधीशांस दूर करण्याचे बहुमती चातुर्य सरकारने दाखवल्यापासून निवडणूक आयोग ही एक घटनात्मक, स्वायत्त यंत्रणा न वाटता एखादे सरकारी खाते आहे की काय अशा पद्धतीने त्याकडे पाहिले जाऊ लागले.

या प्रकरणाने गंभीर वळण घेतले असून निवडणूक आयोगाची स्वायत्तता धोक्यात आली आहे. त्यामुळे यापुढील निवडणुका खुल्या आणि पारदर्शक वातावरणात होणार का, असा प्रश्न पडतो. एकूणच निवडणूक आयोगावर अंकुश प्रस्थापित करण्याचा हा केंद्राचा प्रयत्न दिसतो. नियुक्तीच्या निमित्ताने निवडणूक आयोग नामे यंत्रणेतील पारदर्शकतेचा अभाव हा विषय चर्चेस येणे गरजेचे होते आणि आहेही.

मुख्य निवडणूक आयुक्त निवडण्याच्या पॅनेलमधून सरकारने सरन्यायाधीश यांना वगळले आहे आणि त्यात केंद्र सरकारचे प्राबल्य राहील अशी रचना करण्यात आली आहे. या तरतुदींना आव्हान देणारी याचिका प्रख्यात कायदेतज्ज्ञ प्रशांत भूषण यांनी सर्वोच्च न्यायालयात केली.

याचिकेवरील सुनावणी प्रलंबित असताना, सर्वोच्च न्यायालयाकडून निर्णय अपेक्षित होता. पण आदल्या दिवशीच मुख्य निवडणूक आयुक्त नेमण्यात आल्याची घोषणा सरकारने अधिसूचना काढून जाहीर केली. त्यामुळे ही घोषणा आणि मुख्य निवडणूक आयुक्तांची निवड वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने नवीन कायद्यात तत्काळ हस्तक्षेप करण्यास नकार दिला असला तरी, केंद्र सरकारला नोटीस पाठवून कायदा तपासण्याचे निर्देश दिले आहेत. ज्ञानेश कुमार यांच्या नियुक्तीमुळे कार्यपालिका आणि निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेसंदर्भात गंभीर चर्चा सुरू झाली आहे. निवड समितीत न्यायालयाचा सहभाग नसल्याने कार्यपालिकेच्या नियंत्रणाची शक्यता अधिक वाढली असल्याची विरोधकांकडून व्यक्त होत असलेली भीती रास्त असली तरी, ते सत्तेत असताना निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीवर सत्ताधाऱ्यांचे अगदीच एकतर्फी नियंत्रण असे, ही वस्तुस्थितीही त्यांनी विसरता कामा नये.

ज्ञानेश कुमार यांच्या नियुक्तीमुळे निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेचा प्रश्न नव्याने ऐरणीवर आला आहेच, तर त्याचा एकदाचा कायमस्वरूपी सोक्षमोक्ष लागला पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाने २०२३ च्या कायद्यास आव्हान देणाऱ्या याचिकेवर लवकरात लवकर सुनावणी घेऊन निर्णय दिला पाहिजे, केलेला कायदा घटनाविरोधी असल्याचे जाहीर करावे, अशी मागणी करणारी याचिका दाखल आहे. त्यावर काय निर्णय होईल, हे पाहणे योग्य ठरेल.

संसदेला या संदर्भात कायदा करण्याचा पूर्ण अधिकार आहे. राज्यघटनेमध्येच ते लिहिले आहे. आता कायदा करताना निवड समिती कशी ठेवायची हे संसद ठरवू शकते. कारण कायदा करणे हे संसदेचेच प्रमुख काम आहे. देशाच्या लोकशाही प्रक्रियेमध्ये निवडणुकांना विशेष महत्त्व आहे. त्यांचे पावित्र्य, निपक्षपातीपणा कायम राहण्यासाठी अधिक पारदर्शकपणा हवा. त्यासाठीच या निवड समितीतील तिसरी व्यक्ती तटस्थ असायला हवी, असे कोणालाही वाटू शकते.

याकडे सर्वोच्च न्यायालय कसे बघते आणि राज्यघटनेने दिलेल्या न्यायिक पुनरावलोकनाचा वापर निवडणूक आयुक्त कायद्यासाठी करते का, हे येणाऱ्या काही महिन्यातच स्पष्ट होईल.

-------------------

(लेखक जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे येथून प्रॅक्टीस करत आहेत.)

■ ■ ■

# महाकुंभ, दुसरे शिवधनुष्य..

इंडिया कॉलिंग
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

१३ जानेवारीपासून प्रयागराज येथे सुरू झालेल्या महाकुंभमध्ये आजवर पासष्ट कोटी भाविकांनी संगमात पवित्र स्नान केले असावे. महाकुंभसाठी प्रयागराजला किती कोटी भाविक येतील याचे प्रशासनाचे सर्व अंदाज चुकले. तीन महिन्यांपूर्वी स्वतः मुख्यमंत्री आदित्यनाथ योगी यांनी चाळीस कोटी भाविक येतील असे म्हटले होते.

प्रत्यक्षात देशातूनच नव्हे, तर विदेशातूनही सनातनांचा ओघ शेवटच्या दिवसांपर्यंत चालूच होता. भारतातीलच नव्हे, तर जगातील सर्वात मोठा विशाल धार्मिक सोहळा म्हणून महाकुंभची नोंद होईल. २६ फेब्रुवारी हा महाकुंभचा सांगता दिवस. १८ फेब्रुवारीला मौनी आमवास्येला सर्वाधिक म्हणजे आठ कोटी भाविकांनी संगमावर पवित्र स्नान केले. त्यानंतर भाविकांची गर्दी कमी होईल असे वाटले होते, पण नंतरही गर्दी वाढतच राहिली. प्रयागराजकडे जाणाऱ्या सातही रस्त्यांवर दोन महिने अभूतपूर्व भाविकांची गर्दी आणि वाहनांची कोंडी बघायला मिळाली.

वाहनांच्या दहा किमी रांगा लागल्या होत्या. भाविकांनाही संगमापर्यंत दहा-बारा किमी पायी चालावे लागले. सार्वजनिक बसेस, रिक्षा व दुचाकींना संगमापर्यंत परवानी होती पण त्यासाठी आवाच्या सव्वा भाडे आकारले जात होते. दिल्ली ते प्रयागराज विमानाचे तिकीट ४२ हजारांपर्यंत आकारले गेले. पण महाकुंभ नंतरचे याच मार्गावर विमानाचे तिकीट तीन हजार रुपयांत मिळू शकते.



भारताची लोकसंख्या अंदाजे १४३ कोटी गृहीत धरली, तर त्यात ११० कोटी सनातन धर्माचे आहेत. जगभरात मिळून १२० कोटी सनातनी असावेत, पैकी ५० टक्क्यांपेक्षा जास्त भाविकांनी संगमात पवित्र स्नान केले हा जागतिक विक्रम म्हणावा लागेल. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती धनगड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंग, बहुतेक केंद्रीयमंत्री, राज्यांमधील भाजपाचे मुख्यमंत्री व शेकडो मंत्री, खासदार, आमदार यांनी महाकुंभमध्ये संगमात डुबकी मारली.

भुतानचे राजे खेसर नामग्याल वांगचूक, नेपाळचे शेर बहादूर देऊबा, उद्योगपती मुकेश अंबानी व गौतम अदानी यांनी त्यांच्या परिवारासह पवित्र स्नान केले. चंदेरी दुनियेतील अनेक सेलिब्रेटींनी संगमावर हजेरी लावली. अभिनेत्री व नंतर संन्यासी झालेल्या ममता कुलकर्णी यांना महामंडलेश्वर सन्मान दिल्याबद्दल वादही याच काळात झाला. जवळपास ७५ देशांच्या राजदूतांनी महाकुंभमध्ये प्रयागराजला संगमात स्नान केले. पौष पौर्णिमा, वसंत पंचमी, ३० जानेवारी व १ फेब्रुवारीला पवित्र स्नान करणाऱ्यांची संख्या कोटींवर होती.

दोन महिन्यांत प्रयागराजमध्ये राहणाऱ्या नागरिकांची मात्र मोठी कोंडी झाली. या नगरीत पासष्ट कोटी भाविकांची ये-जा झाली. शाळा तर दोन महिन्यांपासून बंद आहेत. अलाहाबाद विद्यापीठ व महाविद्यालये चालू असली तरी प्राध्यापक व विद्यार्थी वेळेवर पोहोचू शकले नाहीत. ऑनलाइन वर्ग चालू असले तरी मुले अभ्यास करीत नाहीत. उत्तर प्रदेश शालेय बोर्डाने दहावी-बारावीच्या परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. रस्त्यावर एवढी गर्दी की, वयस्कर घराबाहेर पडू शकले नाहीत व कुठे पायीसुद्धा जाऊ शकले नाहीत. महाकुंभच्या महाप्रसिद्धीमुळे कोट्यवधी लोक आले, आता गर्दी थांबवा अशी म्हणायची स्थानिकांवर पाळी आली.

अमृत महोत्सवी स्नान झाल्यावर गर्दी कमी होईल असे वाटले होते, पण तसे घडले नाही. प्रचंड गर्दी व प्रचंड वाहतूक कोंडी, रोज वेगवेगळे रस्ते बंद, व्हीआयपींची मोठी ये-जा, कुणाच्या पोटात दुखले, आजारी पडले तरी सहज डॉक्टरांकडे पोहोचता येत नाही, रिक्षा मिळत नाही, सर्वत्र बॅरिकेटस, मोठा सुरक्षा बंदोबस्त, स्टेशनकडे जाणारे रस्ते बंद, न्यायालयात सुनावणी होत नाही, वकील, पक्षकार पोहोचू शकत नाहीत. गेले दोन महिने प्रयागराजमधील जनजीवन सुरक्षा व गर्दीच्या कोंडीत सापडले आहे.

ज्या संगमात पन्नास-साठ कोटी लोक स्नान करतात ते पाणी शुद्ध कसे राहील? या प्रश्नाने काही काळ वादळ निर्माण केले. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने हरित लवादाला सादर केलेल्या अहवालात संगमातील पाणी अशुद्ध असलेल्याचा अहवाल दिला. पाण्यात विष्ठेतील जीवाणू आहेत, असे त्यात म्हटले होते. त्यावर मुख्यमंत्री योगी यांनी स्वतः खुलासा केला. गंगेचे पाणी जंतुविरहीत व शुद्ध आहे, स्नानाला व पिण्यासही योग्य आहे असे त्यांनी सांगितले. केंद्रात व राज्यात भाजपाचे सरकार आहे. मग संगमातील पाणी शुद्ध आणि अशुद्ध असे दोन वेगळे अहवाल कसे?

महाकुंभचा योग १४४ वर्षांनी आला म्हणून कोट्यवधी भाविक प्रयागराजला संगमावर धावले हे वास्तव आहे. हा श्रद्धेचा विषय आहे. १४४ वर्षांपूर्वी अमृत स्नानाला आपण नव्हतो व १४४ वर्षांनंतर पुन्हा योग येईल तेव्हा पवित्र स्नान करायला आपण नसणार, अशी भावना प्रत्येकाच्या मनात बळावली.

१५ डिसेंबरला आखाड्यांची मिरवणूक निघाली तेव्हा सर्व जगाचे लक्ष वेधले गेले. प्रयागराज महाकुंभ १३ जानेवारी रोजी सुरू झाले तरी त्याची तयारी वर्षभर अगोदर चालू होती. सहा महिने अगोदरपासून उत्तर प्रदेशमधील जिल्ह्यात व तालुक्यात चलो कुंभ चलेङ्ग असे बॅनर्स व होर्डिंग झळकले होते. जयतु महाकुंभ, जयतु सनातन, हे तर महाकुंभचे घोषवाक्य बनले होते.

स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मन की बातच्या ११७व्या मालिकेत महाकुंभ २०२५ ची चर्चा केली होती. संगमावर कशी जय्यत तयारी चालू आहे, याची माहिती दिली होती. महाकुंभ सुरू होण्यापूर्वी त्यांनी हेलिकॉप्टरमधून तयारीची पाहणी केली होती. योगींनी स्वतः पाच वेळा महाकुंभला भेट दिली. स्वतः मोदींनी दोन वेळा संगमात स्नान केले. २०१९ च्या कुंभच्या तुलनेने जनसुविधा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून दिल्या. महाकुंभला जाण्यासाठी शेकडो विशेष रेल्वे गाड्या, जादा विमान सेवा उपलब्ध करण्यात आल्या.

शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांनी म्हटले की, महाकुंभ १४४ वर्षांनी आला असे सांगतात, पण यापूर्वी २००१ व २०१३ च्या कुंभला महाकुंभ म्हटले होते. बागेश्वरधामचे पंडित धीरेंद्र शास्त्री यांनी तर महाकुंभमध्ये स्नान न करणारे देशद्रोही आहेत, अशी टिप्पणी केली. विशाल महाकुंभचे व्यवस्थापन मोठ्या प्रमाणावर करण्यात आले होते तरीही महिन्याभरात पाच दुर्घटना घडल्या. महाकुंभ क्षेत्रात ३५० पेक्षा जास्त फायरब्रिगेड, दोन हजारांपेक्षा जास्त प्रशिक्षित अग्निशमन दलाचे जवान, ५० अग्निशमन केंद्रे होती. आखाडे व तंबूत काही दुर्घटना घडू नये म्हणून तिथे अग्निसुरक्षा उपकरणांची व्यवस्था होती. मौनी आमवास्येला झालेल्या चेंगराचेंगरीत चाळीस लोकांचा मृत्यू झाला, तर दिल्लीत रेल्वे स्टेशनवर झालेल्या चेंगराचेंगरीत १८ जण मरण पावले. देशातील प्रत्येक भाविक योगींच्या कामाचे कौतुक करीत आहे पण राहुल गांधी, अखिलेश यादव किंवा ममता बॅनर्जींसारखे नेते मात्र महाकुंभमधील चुका व त्रुटी शोधून त्यावर टीका करीत राहिले. अखिलेश यादव तर सुरुवातीपासून महाकुंभला विरोध करीत आहेत. महाकुंभचे एवढे विशाल आयोजन का, असा प्रश्न विचारून अखिलेश यांनी महाकुंभला एवढा मोठा निधी कशासाठी असा प्रश्न विचारला होता.

महाकुंभमध्ये ७० लोकही स्नानासाठी येणार नाहीत, असे भाकीत अखिलेश यांनी वर्तवले होते. सरकारी पैसे खर्च करण्यासाठी महाकुंभ असा शब्दप्रयोग वापरण्यात येतो आहे, अशी टीका त्यांनी केली होती. लालूप्रसाद यादव यांनी महाकुंभ फालतू असल्याचे म्हटले. ममता बॅनर्जी यांनी तर महाकुंभला मृत्यूकुंभ संबोधले. ज्यांनी अयोध्येतील राम मंदिराला विरोध केला ते महाकुंभच्या विरोधात बोलत आहेत, हेच गेले दोन महिने ऐकायला मिळाले. पण जयतु महाकुंभ, जयतु सनातन म्हणत, मोदी आणि योगींनी महाकुंभचे शिवधनुष्य उचलून दाखवले.

महाकुंभमध्ये ३००० हून अधिक सीसीटीव्ही कार्यरत होते. महाकुंभ २०२५ ची जगातील सर्वात भव्य अध्यात्मिक सम्मेलन म्हणून नोंद झाली. ६५ कोटी भाविकांनी महाकुंभातील संगमात पवित्र स्नान केले. महाकुंभामध्ये तीन लाख कोटींपेक्षा जास्त व्यवसाय झाला. ५० लाखांहून अधिक नेपाळी भाविकांनी पवित्र स्नान केले. प्रयागराजमधील रस्ते, उड्डाणपूल, सुशोभीकरण, पायाभूत सुविधांसाठी ७५०० कोटी गुंतवलेले आहेत.

●●●●●●

# मुख्यमंत्री आणि फिक्सर अधिकाऱ्यांचा वाद

## राजकीय गोंधळ की भ्रष्टाचारविरोधी पाऊल?

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या एका नव्या वादाने खळबळ उडवली आहे. मुख्यमंत्री स्वतःच आपल्या मंत्रिमंडळातील काही मंत्र्यांनी शिफारस केलेल्या अधिकाऱ्यांना भ्रष्ट, दलाल, आणि फिक्सर असल्याचे जाहीरपणे सांगत आहेत.

विशेष म्हणजे, हे तेच अधिकारी आहेत जे अनेक मंत्र्यांसोबत वर्षानुवर्षे काम करत आहेत आणि त्यांच्याद्वारे भ्रष्ट मार्गाने कामे मार्गी लागत असल्याचा मुख्यमंत्री स्पष्ट आरोप करत आहेत. त्यामुळे सरकारमधील स्वच्छता मोहीम आहे की अंतर्गत राजकीय कुरघोडी, हा प्रश्न निर्माण झाला आहे.

**मुख्यमंत्र्यांचा मोठा दावा**

मुख्यमंत्र्यांनी तब्बल १६ अधिकाऱ्यांना फिक्सर म्हणून नामंजूर केल्याचा दावा केला आहे. मंत्र्यांच्या खासगी सचिव, स्वीय सहाय्यक आणि विशेष कार्य अधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांसाठी त्यांची नावे मान्य करण्यास मुख्यमंत्र्यांनी खळखळ केली आहे.


दिपक कैतके

यामागचे कारणही त्यांनी स्पष्ट केले. हे अधिकारी मंत्र्यांचे मर्जीवान असून, त्यांच्या माध्यमातून भ्रष्टाचार सुरू आहे. विशेषतः, सार्वजनिक कामांमध्ये दलाली आणि लाचखोरीचा आरोप मुख्यमंत्र्यांनी अप्रत्यक्षपणे आपल्या मंत्र्यांवरच केला आहे. पण मग असे मंत्री निवडलेच कसे गेले?

मुख्यमंत्र्यांनीच या मंत्र्यांना राज्यपालांकडून शपथ दिली होती. मग आता त्यांच्याच अधिकाऱ्यांना भ्रष्ट म्हणणे म्हणजे मुख्यमंत्र्यांनीच आपल्या निर्णयांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. जर हे अधिकारी भ्रष्ट असतील, तर त्यांच्या मंत्र्यांचाही त्यात हात आहे का? आणि असे असेल, तर मुख्यमंत्र्यांनी त्यांना मंत्रिमंडळात स्थानच का दिले?

जर मुख्यमंत्र्यांना हे आधीच माहीत होते, तर त्यांनी या अधिकाऱ्यांविरोधात चौकशी लावली का नाही? फक्त मंत्र्यांकडून शिफारस होणाऱ्या अधिकाऱ्यांनाच भ्रष्ट ठरवणे पुरेसे नाही, तर त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली पाहिजे.

सरकारच्या अधिकृत संस्थांकडून त्यांच्या भ्रष्टाचाराची चौकशी झाली पाहिजे आणि दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे. पण तसे न करता फक्त माध्यमांमध्ये वाद निर्माण करणे म्हणजे जनतेच्या डोळ्यात धूळफेक करण्यासारखे वाटते.

**विरोधकही शांत का?**

विशेष म्हणजे, विरोधकांनीही या प्रकरणावर फारशी प्रतिक्रिया दिलेली नाही. जर मुख्यमंत्री स्वतःच आपल्या मंत्र्यांच्या अधिकाऱ्यांवर भ्रष्टाचाराचा आरोप करत असतील, तर विरोधकांनी यावर आक्रमक भूमिका घेतली पाहिजे. त्यांनी या १६ अधिकाऱ्यांची नावे मागितली पाहिजेत, त्यांच्या भ्रष्टाचाराचा तपशील समोर आणण्याची मागणी केली पाहिजे. पण तसे काहीही होत नाही. यावरून असे वाटते की, हा भ्रष्टाचार सरकारमध्येच नाही, तर संपूर्ण राजकीय व्यवस्थेत खोलवर रुजलेला आहे.

**मुख्यमंत्र्यांनी पुढचे पाऊल काय उचलावे?**

जर मुख्यमंत्र्यांना खरोखरच भ्रष्टाचार थांबवायचा असेल, तर त्यांना केवळ निवडणुकीपूर्वीचे स्वच्छ प्रतिमा निर्माण करण्यासाठी आरोप करण्यापेक्षा ठोस कृती करावी लागेल. त्यांनी या १६ अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराचा तपशील उघड करावा, त्यांच्यावर कठोर चौकशी बसवावी, आणि दोषींना निलंबित करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत.

याशिवाय, मंत्र्यांकडेच वर्षानुवर्षे तेच अधिकृत अधिकारी कसे राहतात, हे रोखण्यासाठी ठोस नियम लागू करायला हवेत. असे अधिकारी वर्षानुवर्षे एकाच मंत्र्याच्या अखत्यारीत राहत असल्याने त्यांच्या भ्रष्ट कारभाराला खतपाणी मिळते. यासाठी अधिकाऱ्यांच्या बदल्या नियमित आणि पारदर्शक पद्धतीने करण्याचा कायदा आणला पाहिजे.

**राजकीय स्टंट की सत्य परिस्थिती?**

मुख्यमंत्र्यांनी उपस्थित केलेला मुद्दा अत्यंत गंभीर आहे. जर सरकारमधील अधिकाऱ्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप स्वतः मुख्यमंत्र्यांकडून होत असतील, तर हे संपूर्ण प्रशासनाच्या विश्वासार्हतेवर मोठे प्रश्नचिन्ह आहे. पण हा खरोखरच भ्रष्टाचार संपवण्याचा प्रयत्न आहे की केवळ राजकीय खेळी, हे येणाऱ्या काळातच स्पष्ट होईल.

जर मुख्यमंत्री या १६ अधिकाऱ्यांची नावे उघड करत नाहीत आणि त्यांच्यावर कारवाई करत नाहीत, तर हा फक्त एक राजकीय स्टंट ठरेल. पण जर त्यांनी ठोस कारवाई केली, तर हे महाराष्ट्राच्या प्रशासनात मोठा बदल घडवणारे पाऊल ठरेल.आता हा वाद केवळ चर्चेत राहतो की प्रत्यक्ष कारवाईपर्यंत पोहोचतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

■ ■ ■

# कमी कमाई करणारे ऑनलाइन गेमिंगमध्ये सर्वात पुढे

भारतातील कमाई करणारे त्यांच्या पगाराच्या 33% पेक्षा जास्त रक्कम ईएमआयवर खर्च करतात. 'हाऊ इंडिया स्पेंड्सः अ डीप डायव्ह इनटू कंज्युमर स्पेंडिंग बिहेविअर' या अहवालात ही माहिती समोर आली आहे.

भारतातील सर्वात मोठी B2B SaaS फिनटेक कंपनी Perfeos ने PwC India च्या सहकार्याने हा अहवाल प्रसिद्ध केला. यामध्ये भारतीय ग्राहकांच्या वर्तन पद्धतीचे विश्लेषण करण्यात आले आहे. यामध्ये, 30 लाखांहून अधिक तंत्रज्ञान जाणकार ग्राहकांच्या खर्चाच्या वर्तनाचे परीक्षण करण्यात आले आहे. पगारदार लोक ईएमआय भरण्यात सर्वाधिक पैसे खर्च करतात.

1. ईएमआय वरील खर्च : प्रत्येक शहरातील लोक (लहान ते मोठे) त्यांच्या उत्पन्नाच्या 33% पेक्षा जास्त रक्कम कर्जाचे ईएमआय भरण्यासाठी खर्च करतात.
2. अनिवार्य खर्च : बहुतेक पैसे घरभाडे, वीज बिल इत्यादी आवश्यक खर्चांवर खर्च केले जातात, जे एकूण खर्चाच्या 39% आहे. यानंतर, 32% पैसे अन्न, पेट्रोल इत्यादी आवश्यक खर्चावर खर्च केले जातात. त्याच वेळी, 29% जीवनशैली आणि छंदांशी संबंधित खर्चावर (विवेकाधीन खर्च) खर्च केला जातो.
3. जीवनशैली खर्चः जीवनशैली खर्चाची सर्वाधिक टक्केवारी (62%) फॅशन, खरेदी आणि वैयक्तिक काळजी उत्पादनांवर आहे.
4. खाण्यापिण्याचा खर्चः लोकांचे पगार वाढत असताना, बाहेर जेवण्याचा किंवा ऑनलाइन जेवण ऑर्डर करण्याचा त्यांचा खर्च आणि खर्चाची वारंवारता दोन्ही वाढते.
5. ऑनलाइन गेमिंग खर्चः 20,000 रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या लोकांमध्ये ऑनलाइन गेमिंगवर सर्वाधिक खर्च (22%) होतो. उत्पन्न वाढत असताना, ऑनलाइन गेमिंगवर खर्च करणाऱ्या लोकांचे प्रमाण कमी होते. 75,000 रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्यांमध्ये हे प्रमाण फक्त 12% पर्यंत कमी होते.
6. देयक पद्धतः आवश्यक खर्चासाठी सर्वात जास्त वापरली जाणारी पद्धत म्हणजे ईसीएस(इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सर्व्हिस). त्याच वेळी, आवश्यक आणि जीवनशैली खर्चांसाठी वढकही सर्वात पसंतीची पद्धत आहे.
7. घरभाडेः टियर-2 शहरांमध्ये घराचे भाडे टियर-1 शहरांपेक्षा 4.5% जास्त आहे.
8. वैद्यकीय खर्चः टियर-2 शहरांमधील लोक टियर-1 शहरांमधील लोकांपेक्षा दरमहा सरासरी 20% जास्त वैद्यकीय खर्च करतात. टियर-1 शहरांमध्ये सरासरी वैद्यकीय खर्च दरमहा सुमारे 2,450 रुपये आहे. त्याच वेळी, महानगरांमध्ये सर्वात कमी वैद्यकीय खर्च दरमहा 2,048 रुपये आहे.

**उत्पन्न आणि भूगोलानुसार डेटाचे विश्लेषण**

हा अहवाल प्रामुख्याने फिनटेक कंपन्या (जसे की ऑनलाइन कर्ज अ‍ॅप्स), एनबीएफसी (नॉन-बँकिंग वित्तीय कंपन्या) आणि इतर डिजिटल प्लॅटफॉर्म वापरणाऱ्या कर्जदारांचे विश्लेषण करतो. या ग्राहकांना तीन भौगोलिक क्षेत्रांमध्ये विभागले गेले होते - 1. लहान शहरे (टियर 3), 2. मध्यम शहरे (टियर 2) आणि 3. मोठी शहरे किंवा महानगरे (टियर 1).

तसेच, त्यांचे उत्पन्न देखील वेगळे होते. काहींचे उत्पन्न 20,000 रुपयांपेक्षा कमी होते, तर काहींचे उत्पन्न 1 लाख रुपयांपेक्षा जास्त होते. कमी उत्पन्न असणारे त्याच्या खर्चाचे नियोजन योग्य प्रकारे करीत नाहीत.

■ ■ ■

# तुम्ही पण सकाळी बदाम खाताय का?



बदाम आपल्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानले जातात. बदाममध्ये अनेक प्रकारचे प्रथिने, फायबर, जीवनसत्त्वे, खनिजे आणि ओमेगा-३ फॅटी अ‍ॅसिड असते ज्यांच्यामुळे आपल्या आरोग्याला फायदे होतात.

बदाम खाल्ल्यामुळे तुमच्या आरोग्याला पोषक घटक मिळतात. सकाळी रिकाम्या पोटी रात्रभर भिजवलेले बदाम खाल्ल्यामुळे तुमच्या शरीराला अनेक फयदे होतात. त्यामुळे तज्ञांच्या सल्ल्यानुसार, प्रत्येकाने दररोज सकाळी बदाम भिजवलेले बदाम खावेत. सकाळी रिकाम्या पोटी रात्रभर पाण्यात भिजवलेले बदाम खाल्ल्यामुळे तुमच्या आरोग्या संबंधित अनेक समस्या दूर होतात.

अभ्यासानुसार, एक चतुर्थांश कप बदामामध्ये 6 ग्रॅम प्रथिने, 152 कॅलरिज, 14 ग्राम फॅट, 6 ग्राम कार्बोहायड्रेट्स, 3 ग्राम डायटरी फायबर आणि 1 ग्राम साखर असते. तज्ञांच्या मते, बदाममध्ये भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन ई, व्हिटॅमिन बी, मॅग्नेशियम, फॉस्फरस आणि पोटॅशियम देखील असते ज्यामुळे तुमच्या आरोग्याला अनेक फायदे होतात.

मिळालेल्या आव्हालानुसार, तुम्ही दिवसभरामध्ये 8-10 बदाम खाऊ शकतात. बदाम खाल्ल्यामुळे तुमच्या आरोग्यालाच नाही तर तुमच्या त्वचेला अनेक फायदे होतात.

तुम्ही नियमित बदामाचे सेवन केल्यामुळे तुमच्या शरीरातील कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होते. तुमच्या शरीराला योग्य प्रमाणात पोषण मिळण्यास मदत होते. बदाम खाल्ल्यामुळे लिपोप्रोटीन नावाच्या खराब कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होण्यास मदत होते.

त्यासोबतच तुमच्या शरीरातील चांगल्या कोलेस्ट्रॉल म्हणजेच लिपोप्रोटीनची पातळी वाढण्यास मदत होते. बदामामध्ये दाहक विरोधी गुणधर्म असतात ज्यामुळे तुमच्या हृदयाचे आरोग्य निरोगी राहाण्यास मदत होते आणि हृदय विकाराचा धोका दूर होतो.

बदाममध्ये चांगले कॅलरीज भरपूर प्रमाणात आढळते ज्यामुळे तुमच्या शरीरातील वजन निर्यंत्रित राहाते आणि लठ्ठपणाच्या समस्या दूर होण्यास मदत होते. बदाममध्ये प्रथिने आणि फायबर आढळतात ज्यामुळे तुमचे पोट नेहमी भरल्यासारखे वाटते आणि तुमच्या शरीरातील कॅलरीजची पातळी नियंत्रित राहाते. मधुमेहाच्या रूग्णांसाठी बदामचे सेवन अत्यंत फायदेशीर ठरते.

बदाम खाल्ल्यामुळे तुमच्या रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित राहाण्यास मदत होते. क्यासोबतच बदममध्ये ग्लायसेमिक इंडेक्स कमी असतो आमि फायबर जास्त प्रमाणात असते ज्यामुळे मधुमेहाचा धोका कमी होण्यास मदत होते.

बदामाचे सेवन तुमच्या त्वचेच्या आरोग्यासाठी देखील फायदेशीर असते. बदाममध्ये भरपूर प्रमाणात प्रथिने, जीवनसत्त्वे, खनिजे, फायबर आणि ओमेगा-३ फॅटी अ‍ॅसिड असतात ज्यामुळे तुमच्या त्वचेचं आरोग्य निरोगी राहाण्यास मदत होते.

बदाममध्ये आढळणारे पोषक घटक तुमच्या चेहऱ्यावरील सुरकुत्या कमी करतात, त्वचा मऊ करतात आणि वृद्धत्वाची लक्षणे दूर ठेवतात. आता अनेकांना प्रश्न पडतो की बदमाचे सेवन कसे करावे?

तुम्ही बदामाचे सेवन कच्चे, भिजवलेले किंवा भजून खाऊ शकतात. रात्रभर बदाम पाण्यामध्ये भिजवल्यामुळे त्यामध्ये पोषक तत्वांची अधिक वाढ होते. त्यामुळे भिजवलेल्या बदामाचे सेवन करून तुमच्या आरोग्याला अनेक फायदे होतात. तुम्ही बदाम नाशत्यामध्ये, दहीमध्ये, सॅलेडमध्ये खाऊ शकता.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### नाही कसं म्हणता?

मराठी भाषेचे
आम्ही पाईक सारे
इंग्रजीचे गुणगाण
करतोय बरे
अशाने
मातृभाषेचा अवमान
होतोय की नाय?

लेकरे आमची
कान्हेंट मध्ये शिकती
मराठी शाळांना
लागलीय गळती
अशानं
मातृभाषा लोप
पावणार की नाय?

ब्रिटीशांना जाऊन
कैक वर्ष झाली
तरी शासन दरबारी
मराठी नाय रुजली
ही उदासिनता
घातक ठरते की नाय?











## आज का अंदाज

गुरूवार २७ फेब्रुवारी २०२५

**खुल जा सीम सीम**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ५ | ६ | २ | ४ | ६ | ९ |
| २४५ | २५७ | १४० | २६० | ३९० | १३० | १५० | ३६० |
| ३४४ | ५८० | २६७ | ३३० | २४६ | २६६ | ३४९ | ४५० |
| ५६० | ४३६ | ७८० | ७९० | ४८० | २२० | ७९० | २७० |
| १२ | ३१ | ५४ | ६३ | २१ | ४२ | ६१ | ९७ |
| १४ | ३५ | ५६ | ६४ | २५ | ४४ | ६३ | ९३ |
| १९ | ३७ | ५८ | ६८ | २८ | ४३ | ६८ | ९५ |

**२७ फेब्रुवारी: सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २५ | ३१ | ४१ | ७१ |
| २६ | ३५ | ४५ | ७२ |
| २८ | ३६ | ४८ | ७५ |

## शब्दकोडे क्रमांक २०४५

**आडवे शब्द :-**

१) कारखान्याचा मालक
६) ** ** **** तया यातना कठिण
११) गोळा झालेले, हिशोबातील एक बाजू
१२) काडीमोड
१४) मला
१५) शेत, जाणेयेणे
१७) बाळाचा जन्मजात गुटगुटीपणा
१९) यमाने दिलेल्या वेदना
२३) कुळावरील सरकारी कर, प्रजा
२५) ताजा, नव्या दमाचा
२८) अजागळ, अव्यवस्थित राहणारा
२९) समशेर
३२) चक्र
३३) पाण्याचे हवेत झालेले रुपांतर
३४) जसे काही
३५) गाडीचे छ्त
३७) अरण्यवास
३८) त्रासदायक बडबड
४०) दहाचा समूह
४१) जाड, मोठा हातोडा
४२) चप्पल
४४) रांग, ओख(हिं)
४६) चेह-यावरील तेज
४७) अवधान, चित्त
४८) एक द्विदल धान्य
५१) संसद सदस्य
५३) दावानल
५५) भांबावलेला
५७) गाडीचे छत
५८) दारूचा एक प्रकार
६०) दुसऱ्याच्या मनातील विचार ओळखणारा
६२) वाहणारी हवा
६४) शंभर घोडेस्वारांची टोळी, तुकडी
६६) कप्पा, खण
६७) दृष्टीभेट
६९) पडसे
७२) पूजा साहित्याचे ताट
७३) युवक-युवती
७५) कापडी बंद
७६) गमन करणे
७७) चुलीत, शेगडीत जाळण्याचे इंधन

**उभे शब्द :-**

१) रात्री चमकणारा किडा
२) रमापती
३) व्यापारी फायदा
४) दरवाजा
५) गावाखालची जमीन
७) प्रहर
८) काजळ, सुरमा इ प्रकार
९) आकर्षक
१०) पुन्हा
१३) शिव्याशाप
१६) प्रजा
१८) चाकरी, शुश्रूषा
२०) रसाळ
२१) जत्रा
२२) बारसे, नाव ठेवण्याचा विधि
२४) वर्तन
२६) आजोबा म्हणून हाक मारणारी
२७) अवाजवी
३०) तात्काळ
३१) कणीदार
३४) जाड झालेली केसांची बट
३६) पालव
३८) पदार्थाचा सूक्ष्म भाग
३९) एकाग्र नजर
४१) निबिड, गर्द (अरण्य)
४३) घोडीला किंवा गाढवीला येणारा माज
४५) ताऱ्यांचा स्वामी असलेला चंद्र
४७) भ्रम
४९) वल्लरी
५०) लाज
५१) किंचित खाली
५२) चापट, मऊ पदार्थाचा आघात
५३) समुद्रातील अग्नी
५४) प्रहार, घाव, दिवस
५६) वन, रान
५९) कामदेव
६१) दरवडेखोर
६३) गवंडी
६४) माघारी येणे
६५) तापापूर्वीचे अंग मोडून येणे
६८) गावठी दंतमंजन
७०) सूर्याचे एक नाव
७१) जल
७३) बारा वर्षाचा काळ
७४) सौंदर्य


(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| टो | ण | गा | | ध | न्य | वा | द | | आ | पा | द | म | स्त | क |
| क | | ज | मी | न | | ता | म | सी | | र | स्ता | | व | |
| दा | द | र | | वा | स | व | | ता | री | ख | | मा | न | व |
| र | | पा | व | न | | र | मा | | स | | म | त | | न |
| | पा | र | | | अ | ण | ग | ट | | म | | क | ड | वा |
| पा | ल | खी | प | द | स्थ | | मू | | मि | ला | व | ट | | स |
| चा | क | | स | | मा | न | स | पु | त्र | | न | | वि | |
| मु | | न | र | म | | र | | ण्य | | दे | वा | स | मा | न |
| खी | र | | ट | म | ट | म | | | सा | ह | स | | न | र |
| प | सा | रा | | ता | र | | क | स | म | | वा | र्ता | | क |
| र | | ग | वा | | फ | रा | स | खा | ना | | डी | | छा | या |
| मे | थी | | क | मा | ल | | क | | वी | ज | | खि | | त |
| क्ष | | ज | डा | व | | ब | स | क | र | | आ | रा | ध | ना |
| र | ज | त | | स | क | ल | | र | | को | रा | | ड | |
| | म | न | न | | र | क | म | पा | त | | म | ळ | क | ट |




## ट्रोलर्सवर बरसला वीर





## ‘छावा’ने उडवली चर्चेची राळ



## ओटीटीवर मनोरंजनाचा वसंत

## ...म्हणून शो सोडला






## मैदानावर चर्चा उर्वशीची



## ‘स्पायडर-मॅन ४’च्या जाळ्यात...



## नव्याच्या निमित्ताने जुन्याची चर्चा



## संजूबाबाचा सत्संग



# स्पेनचा टँगो संत्रा महाराष्ट्रात येणार



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :
महाराष्ट्रातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी मोठी आनंदाची बातमी आहे. दोन वर्षांनंतर त्यांना स्पेनमधील टँगो संत्र्याची कलमे मिळणार आहेत. नाशिकच्या सह्याद्री फार्मचे विलास शिंदे यांनी या प्रकल्पाचा पुढाकार घेतला आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह ४२ संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी स्पेनचा अभ्यास दौरा केला. त्यांनी व्हॅलेन्सिया प्रांतातील संत्रा उत्पादनाची पाहणी केली. स्पेनमध्ये २०२१ मध्ये ३.३ हजार मेट्रिक टनांपेक्षा जास्त संत्रा उत्पादन झाले होते.

टँगो संत्र्याचे वैशिष्ट्य म्हणजे ते बियारहित आहे. नागपुरी संत्र्यापेक्षा त्याची चव, आकार, गोडवा आणि रंग अधिक चांगला आहे. काढणीनंतर नागपुरी संत्रा ८ दिवस टिकतो, तर टँगो संत्रा १५ दिवस टिकतो. टँगो संत्र्याचे हेक्टरी उत्पादन ७० टन आहे, तर नागपुरी संत्र्याचे केवळ २० टन आहे.

सह्याद्री फार्मचे विलास शिंदे यांनी स्वखर्चाने स्पेनमधून कलमे आणली आहेत. पुढील दोन वर्षे या संत्र्याचे स्थानिक वातावरणात परीक्षण केले जाईल. त्यानंतरच ही कलमे शेतकऱ्यांना वितरित करण्यात येतील. सध्या नागपूर संत्र्याला (मँडारिन) त्याच्या विशिष्ट चवीशिवाय जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मक फायदा नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात त्याला विशेष मागणी नाही. या पार्श्वभूमीवर टँगो संत्र्याची कलमे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरू शकतात.

विदर्भातल १ लाख ६० हजार हेक्टरमधील संत्रा बागा उत्पादनक्षम आहेत. या बागांपासून दरवर्षी किमान ७.५० ते ८ लाख टन संत्र्याचे उत्पादन होत असून, यात सरासरी ४.५० ते ५ लाख टन अंबिया आणि २.५० ते ३ लाख टन मृग बहाराच्या संत्र्याचा समावेश आहे. २०१९-२० पर्यंत यातील सरासरी २ ते २.५० लाख टन संत्र्याची निर्यात व्हायची. यातील किमान १.७५ लाख टन संत्रा बांगलादेशात निर्यात व्हायचा. पण, वाढवलेल्या आयात शुल्कामुळेसंत्रा उत्पादक शेतकरी अडचणीत सापडलेला आहे.

# मार्कंडासह गायमुख, आंभोरा भाविकांनी फुलले





■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :
महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर विदर्भातील प्रख्यात मार्कंडा, गायमुख, आंभोरा आणि अन्य तीर्थक्षेत्र भाविकांनी गजबजले आहेत. दोन दिवसांपासूनच येथे भाविकांचे जत्थे आले असून, आज महाशिवरात्रीच्या दिवशी लक्षावधी भाविकांनी पुजाअर्चा केली.

गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यात मार्कंडेश्वराच्या महाशिवरात्री यात्रेला सोमवारपासून सुरुवात झाली आहे. दररोज सुमारे एक लाख भाविक दर्शनासाठी येत आहेत. महाशिवरात्रीच्या दिवशी ही संख्या दोन ते तीन लाखांपर्यंत पोहोचते.

वैनगंगा नदीच्या काठावर वसलेल्या मार्कंडा गावातील ही मंदिरे विदर्भातील खजुराहो म्हणून प्रसिद्ध आहेत. छत्तीसगड, मध्यप्रदेश आणि विदर्भाच्या इतर जिल्ह्यांतून मोठ्या संख्येने भाविक येथे येतात. दहा दिवसांच्या या यात्रेत एकूण बारा लाख भाविक दर्शन घेतात.

यात्रेदरम्यान विविध प्रकारच्या बाजारपेठा भरतात आणि मनोरंजनासाठी पाळणेही लावले जातात. आबालवृद्धांसाठी ही वार्षिक यात्रा सांस्कृतिक वारसा बनली आहे. अकराव्या शतकात वा त्यानंतर बांधलेली ही मंदिरे भारतीय शिल्पकलेचे उत्कृष्ट उदाहरण आहेत. दीडशे वर्षांपूर्वी वीज पडल्याने मंदिराचे काही नुकसान झाले असले तरी त्यांचे देखणेपण अजूनही कायम आहे.

मार्कंडा देव हे भगवान शिवाचे महत्त्वाचे स्थान असून संपूर्ण भारतातील श्रद्धाळूंसाठी आस्थेचे केंद्र आहे. उत्तर हिंदुस्थानी पद्धतीचे आणि खजुराहो मंदिराच्या तोडीस तोड असलेले मार्कंडा हे देवस्थान विदर्भात गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यात आहे. संथपणे वाहणारी उत्तरवाहिनी वैनगंगा आणि तिच्या तिरावरची अप्रतिम स्थापत्यशैली असलेली ही मंदिरे, भुरळ घालणारी आहेत.

मार्कंडा येथील देवालये दक्षिणोत्तर 196 फूट लांब आणि पूर्व-पश्चिम 168 फूट लांब अशी काटकोनात वसलेली आहेत. सभोवती 9 फूट उंचीची भिंत आहे आणि काटकोनी आकारामध्ये एकूण 18 देवळे आहेत. या मंदिराकडे बघतांना आपण खजुराहोची मंदिरे बघत असल्याचा भास होतो.

दुसरीकडे, नागपूर जिल्ह्याच्या कुही तालुक्यातील आंभोरा, भंडारा जिल्ह्यातील गायमुख, गोंदिया जिल्ह्यातील प्रतापगड यासह ठिकठिकाणच्या शिवमंदिरात बुधवारी शिवरात्री निमित्त यात्रा आणि धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. लक्षावधी भाविकांनी आज मनोभावे पूजा केली.

# मी इतका मोठा माणूस नाही...





■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २६ :
शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली. यानंतर राजकीय वर्तुळात अनेक चर्चांना उधाण आले. पण जयंत पाटील यांचा राजकीय भविष्याबाबत बोलण्याइतका मोठा माणूस नाही, पण त्यांचे प्रश्न मार्गी लावणार असे बावनकुळे यांनी म्हटले आहे.

बावनकुळे पुढे बोलताना म्हणाले की, जयंत पाटील हे माझी वेळ घेऊन भेटायला आले होते. तिथे 400 ते 500 लोकं उपस्थित होती. आमच्यात कुठलीही राजकीय चर्चा झाली नाही. केवळ विकास कामांसंदर्भात चर्चा झाली.

जयंत पाटील यांनी त्यांच्या सांगली जिल्ह्यातील विकासकामांबाबत चर्चा केली. मी त्यांना आश्वासन दिले आहे की, येणाऱ्या अधिवेशनात त्यांच्या समस्यांच्या संदर्भात एक बैठक लावणार आहे. जयंत पाटील हे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आहेत. ते त्यांच्या मतदारसंघाचे प्रश्न घेऊन भेटायला आले होते. यावेळी विकासकामांवर सविस्तर चर्चा झाली.

**राजकीय भेट नव्हती- जयंत पाटील**

जयंत पाटील म्हणाले की, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासोबत माझ 25 मिनिटे चर्चा झाली, पण भेटीत राजकीय हेतू नव्हता असे स्पष्टीकरण राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी दिले.

# नीलम गोऱ्हेंना सभापतींची फटकार





■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २६ :
विधान परिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे यांनी मराठी साहित्य संमेलनाच्या मंचावरून ठाकरे गटावर टीका करणाऱ्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांना खडेबोल सुनावलेत.

पीठासीन अधिकाऱ्याने एखाद्या विषयावर स्वतःचे प्रतिकूल मत असले तरी आपली मर्यादा पाळावी, असे त्यांनी म्हटले आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेच्या उपनेत्या तथा विधान परिषदेच्या उपसभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे यांनी उद्धव ठाकरे गटात गिफ्टच्या मोबदल्यात पदे मिळत असल्याचा आरोप केला होता. अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या निमित्ताने त्यांनी हे विधान केले होते. त्यांच्या या विधानामुळे राज्याच्या राजकारणात एकच वावटळ सुटली असताना विधान परिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे यांनी त्यांना स्वतःच्या मर्यादा सांभाळून बोलण्याचे खडेबोल सुनावलेत.

विधान परिषदेचे सभापती व उपसभापती हे पद घटनात्मक आहे. कायद्याच्या दृष्टिकोनातून हे पद उच्च आहे. त्याची प्रतिष्ठाही वेगळी आहे. त्यामुळे त्याचा आदर बाळगला गेलाच पाहिजे. पीठासीन अधिकाऱ्याने एखाद्या विषयावर स्वतःचे मत प्रतिकूल असले तरी आपल्या मर्यादा पाळल्या पाहिजेत, असे राम शिंदे यांनी यांनी म्हटले आहे.

नीलम गोऱ्हे यांनी ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात बोलताना उद्धव ठाकरे यांच्यावर गंभीर आरोप केले. ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडिज गाड्या मिळाल्या की एक पद मिळते ही वस्तुस्थिती आहे. बाळासाहेब ठाकरे जोपर्यंत होते तोपर्यंत त्यांचे सगळीकडे लक्ष होते. नंतर अवनती होत गेली, असे त्या म्हणाल्या होत्या. शरद पवारांनी या प्रकरणी नीलम गोऱ्हे यांचा समाचार घेत त्यांचे हे विधान मूर्खपणाचे असल्याचे म्हटले होते.

## प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना
# देशभरात महाराष्ट्र अव्वल

२२६३ कोटींची गुंतवणूक, ३८९ कोटी अनुदान वाटप



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २६ :
प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे महाराष्ट्र देशात आघाडीवर असून राज्यातील २२,०१० प्रकल्प मंजूर झाले आहेत. छत्रपती संभाजीनगर येथे सर्वाधिक १,८९५ प्रकल्प मंजूर असून, देशात २२,००० प्रकल्प मंजुरीचा टप्पा ओलांडणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले आहे, अशी माहिती कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी दिली.

महाराष्ट्र देशात प्रथम

बिहार राज्य २१,२४८ प्रकल्पांसह दुसऱ्या स्थानी, तर उत्तर प्रदेश १५,४४९ प्रकल्पांसह तिसऱ्या स्थानी आहे. महाराष्ट्रात प्रकल्प मंजुरीत छत्रपती संभाजीनगर प्रथम, अहिल्यानगर द्वितीय आणि सांगली जिल्हा तृतीय स्थानावर आहे. या योजनेतून २२६३ कोटींची गुंतवणूक झाली असून, ३८९ कोटी रुपयांचे अनुदान लाभार्थ्यांना वितरित करण्यात आले आहे.

नवीन व चालू सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना विस्तारीकरण, आधुनिकीकरणासाठी बँक क्रेडिट लिंक्ड सबसिडी दिली जाते.

## : लोकसेवार्थ :

मतिमंद मुलं वाढवणं, ही खरंच तारेवरची कसरत असते. या मुलांना वाढवताना समाजाच्या काहीशा उत्सुक आणि सहानुभूतिपूर्ण, तर क्वचित उपहासात्मक नजरांचा सामना करताना त्यांच्या पालकांची होणारी ओढाताण तर शब्दातीत असते.

या विशेष मुलांसाठी काहीतरी करावं, या उद्देशाने पाच विशेष मुलांसह 'शेल्टर होम' सुरू केलेल्या आधार संस्थेचा आता वटवृक्ष झाला आहे आणि त्यांच्या डोक्यावर सावली धरता धरता मतिमंद मुलांच्या पालकांची झोळी समाधानाने भरून गेली आहे. भारतातील सर्वात पहिली विशेष मुलांची संस्था म्हणजे आधार !

आपल्या पश्चात आपल्या मतिमंद मुलाची देखभाल कोण करणार? या काळजीतून अमेरिकेत एका वृद्ध आईने आपल्या मुलाची हत्या केली होती. ही बातमी वाचून मुंबईतल्या एका संस्थेच्या अपंग सेलचे प्रमुख असणाऱ्या माधवराव गोरे यांनी अस्वस्थ होत १९९४ साली ही संस्था सुरू केली. त्यावेळी देशात मतिमंदांचा आजीवन सांभाळ करून त्यांची काळजी घेणारी कोणतीही संस्था नव्हती. मतिमंद मुलांच्या पालकांचा आधारच्या उभारणीत महत्वाचा वाटा होता. का र ण

## मतिमंद मुलांचे स्थान उंचाविणारे आधार



लोकजागर

विशेष मुलांच्या समस्यांची जाणीव आणि कल्पना त्यांना चांगल्याप्रकारे माहित होती. आधार मधील शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या अपंग मुलांच्या चेहऱ्यावरील समाधान बरेच काही सांगून जाते. मागील दोन दशकांपासून बदलापूरजवळ असलेल्या मूळगाव भागात ही संस्था कार्यरत आहे.

या ठिकाणी मतिमंद मुलांच्या संगोपनासाठी शेल्टर होम उभारण्यात आले असून, येथे सध्या दोनशे मतिमंद मुलांचा सांभाळ केला जात आहे. पहिल्या वर्षी पाचवर असणारी मुलांची संख्या दुस?या वर्षी थेट ५० वर गेली. गतिमंद मुले १८ वषार्ची होईपर्यंत त्यांचा सांभाळ करणे सोपे असते, मात्र त्यानंतर त्यांच्याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे असते. अनेक पालकांना कामाच्या व्यापातून किंवा उतारवयामुळे हे शक्य होत नाही. त्यामुळे पालकांच्याच सहभागातून स्थापन झालेल्या संस्थेत १८ वर्षावरील मुलांचा आजीवन सांभाळ केला जातो. माधवराव गोरे यांचे पुत्र विश्वास गोरे हे सध्या या संस्थेची देखभाल करत असून, सध्या या संस्थेत फक्त भारतातीलच नव्हे तर अमेरिका, दुबई अशा ठिकाणचीसुद्धा १८ वर्षापासून ते ६० वर्षापर्यंतची मुले, मुली वास्तव्यास आहेत. तीन पाळ्यांत काम करणारे सुमारे १६५ कर्मचारी त्यांचा उत्तमरीत्या सांभाळ करत आहेत.

साडेसहा एकर पसरलेल्या संस्थेच्या या व्यापात पाच निवासी संकुले, कार्यशाळा, स्वयंपाकघर, मैदान आणि दवाखाना यांसारख्या सुविधा सध्या उपलब्ध आहेत. या मुलांना शिकवताना कमालीचा संयम आवश्यक आहे. मतिमंद मुलांना त्याहुनही तीव्र अपंगत्व असलेल्या मुलांना शिकवणं ही अवघड कामगिरी सावलीचे शिक्षक लीलया पेलतात. एखादे काम मनासारखे न झाल्यास किंवा त्यांना अटकाव केल्यास हायपर ॲक्टीव मुले दंगा करतात, रडतात, बोचकारतात. अशावेळी या मुलांना विश्वासात घेऊन, त्यांच्या मनातील भिती दुर करुन त्यांना आपलेसं करण्याचं आव्हान या शिक्षकांसमोर असतं.

वाळुचे कण रगडिता तेल ही गळे ही उक्ती आधारच्या शिक्षकांना चपखल बसते. या संस्थेने मुलांच्या संगोपनासाठी लागणाऱ्या दैनंदिन गरजा स्वतःच भागवण्याचा प्रयत्न केला असून, याच संकल्पनेतून या संस्थेला दररोज लागणारे सुमारे ५० लिटर दूध संस्थेच्या स्वतःच्या तबेल्यातून त्यांना उपलब्ध होते. कोण म्हणेल मतिमंद परि बोलके आमचे अंग अंग या ओळी सत्यात उतरवण्यासाठी आधार अखंड पणे झटत आहे.

■ ■

**शब्दार्थ**
**MBA**
एमबीए म्हणजे मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन. ही व्यवसाय प्रशासनातील पदव्युत्तर पदवी आहे. एमबीए मध्ये विद्यार्थ्यांना व्यवसायाच्या विविध पैलूंवर शिक्षण दिले जाते, जसे की वित्त, मार्केटिंग, मानव संसाधन व्यवस्थापन, उत्पादन, व्यवसाय रणनीति.

■ ■

## : भक्तिरंग :

अनंत श्री विभूषित जगद्गुरु प्रियदर्शी महाराज द्वारा लिखित अभूतपूर्व ग्रंथ 'श्री कृष्ण चरित मानस' (रसायण महाकाव्य) च्या माध्यमातून मुंबईतील श्री स्वामी प्रेमपुरी आश्रमात पंधरा दिवसांचे भगवान श्री कृष्ण यांच्या कथेवर आधारित कीर्तन-सत्संग होत आहे.

या सत्संगमध्ये भगवान श्रीकृष्ण यांच्या बाल्यकाळातील प्रेमळ कथांवर विशेष चर्चा होत आहे.कोणत्याही बालकाचे बाल्यावस्थेतील जीवन, त्याचे भविष्य, त्याचा बाल्यकाळ कसा आहे, त्याची शिकवण, प्रेरणा, परिस्थिती, परिस्थितीशी कशी तडजोड करावी, त्याकडे कसे पहावे, त्यातून कसे प्रवाही व्हावे हे सर्व आपल्याला श्री कृष्ण चरित मानस मध्ये पाहायला आणि समजायला मिळते. श्री कृष्णकथेत पुतनाचा संदर्भ कोणत्या प्रकारचा आहे? कोण आहे पूतना? मानसमध्ये पूतना ही अविद्येची रुपक आहे.

## कथन श्री कृष्ण चरित मानस कथांचे



अज्ञान काय आहे? जिथे अज्ञान आहे तिथेच अविद्या आहे. जगातील परम दुःखाचे कारण आपल्या जीवनातील अज्ञान आहे. मानस आपल्याला सांगते की, दुःख दूर करण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे ज्ञान. तुमच्या जवळच्या वातावरणातील लोकांशी कसे बोलावे? हे तुम्हाला कसे कळते? त्यांच्याशी आपले नाते कसे टिकवायचे? हा गोंधळ ज्ञानानेच सोडवला जाऊ शकतो. जर तुम्ही ज्ञानी असाल तर तुमचे जीवन आनंदाने भरून जाईल. पण जर तुम्ही ज्ञानी नसाल तर अज्ञानासोबत तुमचे जीवन दयनीय होऊन जाईल.

तुमच्या ऑफिसमध्ये सहकाऱ्यांसोबत, बॉससोबत, कर्मचाऱ्यांसोबत, काम कसे करून घ्यावे किंवा स्वतः काम कसे करावे? हे तुम्हाला ज्ञान असेल तर तुम्हाला सुखद जाईल, तुमचे ऑफिसमधले आयुष्य चांगले व्यतीत होईल. पण जर ज्ञान नसेल तर अज्ञानामुळे तुम्हाला कठोर वेदनेतून जावे लागेल. भगवंताच्या भक्तीने आपले अज्ञान कसे दूर होऊ शकते? भगवान श्रीकृष्णाबद्दल ब्रिजच्या लोकांचे दृष्टिकोन काय आहेत?

प्रेमात कसे ऐश्वर्य विसरावे? प्रेमात कसा आपलेपणा आहे, जवळीक आहे? प्रेमात कशी त्यागाची भावना आहे, देण्याची भावना आहे? तत्सुख सुखित्व भाव म्हणजे प्रेम आहे. त्याचे अनुसरण करून अंतिम ध्येय कसे गाठायचे? ही शिकवण आपल्याला मानसच्या कथांमधून मिळते. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आज पुरस्कार प्रदान सोहळा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :
मराठी भाषा गौरव दिनानिमित्त गुरूवार २७ फेब्रुवारी रोजी मुंबईतील गेटवे ऑफ इंडिया येथे सायंकाळी ५ वाजता विशेष गौरव व पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या मान्यवरांचा या सोहळ्यात सन्मान करण्यात येणार आहे.

या सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, तसेच मराठी भाषा मंत्री उदय सामंत, सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, संसद सदस्य तसेच विधानसभेचे व विधान परिषदेचे सदस्य उपस्थित राहणार आहेत.

या सोहळ्यात मराठी भाषा विभागाच्या २०२४ सालच्या विविध पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून ज्येष्ठ साहित्यिक रावसाहेब रंगराव बोराडे यांना विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. तसेच, श्री. पु. भागवत पुरस्कार ज्योत्स्ना प्रकाशन, पुणे यांना देण्यात येणार आहे.

डॉ. अशोक केळकर भाषा अभ्यासक पुरस्कार डॉ. रमेश सिताराम सूर्यवंशी यांना, मंगेश पाडगावकर भाषा संवर्धन पुरस्कार श्रीमती भीमाबाई जोंधळे यांना, कवी केशवसुत पुरस्कार (काव्य) एकनाथ पाटील यांना, राम गणेश गडकरी पुरस्कार (नाटक/एकांकिका): मकरंद साठे यांना, हरि नारायण आपटे पुरस्कार (कादंबरी): आनंद विंगकर यांना, दिवाकर कृष्ण पुरस्कार (लघुकथा): दिलीप नाईक-निबांळकर यांना, अनंत काणेकर पुरस्कार (ललितगद्य): अंजली जोशी यांना प्रदान करण्यात येणार आहे.

# आयएनएस गुलदार होणार
# पर्यटन आकर्षण



विजयदुर्ग खाडीत बुडवून बनवणार भारताचे पहिले अंडरवॉटर म्युझियम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :
भारतीय नौदलाची निवृत्त युद्धनौका आयएनएस गुलदार आता पर्यटकांसाठी नवे आकर्षण ठरणार आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने (एमटीडीसी) ही युद्धनौका ताब्यात घेतली आहे. विजयदुर्ग खाडीत ही नौका बुडवून देशातील पहिले अंडरवॉटर म्युझियम साकारले जाणार आहे.

आयएनएस गुलदारने ३० डिसेंबर १९८५ पासून नौदलात सेवा बजावली. १२ जानेवारी २०२५ रोजी ४० वर्षांची सेवा पूर्ण करून ही नौका निवृत्त होणार आहे. एमटीडीसीचे व्यवस्थापकीय संचालक मनोज कुमार सूर्यवंशी यांनी सांगितले की, युद्धनौकेला शास्त्रीय पद्धतीने स्वच्छ केल्यानंतर विजयदुर्ग खाडीत बुडवण्यात येईल.

पर्यटकांना दोन पद्धतींनी या युद्धनौकेचे दर्शन घेता येणार आहे. प्रमाणित स्कुबा डायव्हरच्या मदतीने पाण्याखाली जाऊन नौका पाहता येईल. स्कुबा डायव्हिंगची भीती असणाऱ्यांसाठी एमटीडीसी पाणबुडीची सोय करणार आहे. विजयदुर्ग मराठ्यांच्या काळात १०५ वर्षे त्यांच्या ताब्यात होता. ही खाडी नौकांसाठी सुरक्षित मानली जाते.

# ऊर्जा परिवर्तनासाठी महावितरणला सर्वोत्कृष्ट कामगिरीचा राष्ट्रीय पुरस्कार



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यात अंमलात येणाऱ्या ऊर्जा परिवर्तन योजनेतील विशेष कायार्साठी महावितरणला इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे नवी दिल्ली येथे मंगळवारी आयोजित केलेल्या तेराव्या ग्रीन एनर्जी समिटमध्ये राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले.

महावितरणला या प्रतिष्ठित परिषदेत स्टेट लेव्हल एक्सलन्स ॲवॉर्ड इन एनर्जी ट्रान्झिशन या गटात पुरस्कार मिळाला. अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांच्या मार्गदर्शनात राज्याचा ऊर्जा परिवर्तन आराखडा तयार करण्यात आला आहे. महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणकडून ऊर्जा परिवर्तन योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

नवी दिल्ली येथील पुरस्कार सोहळ्यात महावितरणचे कार्यकारी संचालक (वितरण) दत्तात्रय पडळकर, मुख्य अभियंता संदीप पाटील, अधीक्षक अभियंता नीलकमल चौधरी आणि अधीक्षक अभियंता संजय वाघमारे यांनी पुरस्कार स्वीकारला. पुरस्कार सोहळ्याचे मुख्य अतिथी म्हणून पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू नियामक मंडळाचे अध्यक्ष अनिलकुमार जैन उपस्थित होते. तसेच ज्युरी मंडळाचे प्रमुख माजी केंद्रीय ऊर्जा सचिव अनिल राजदान उपस्थित होते.

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलिअन डॉलर्सची करण्यासाठी आगामी काळातील ऊर्जेची वाढती गरज ध्यानात घेऊन राज्याच्या ऊर्जा क्षमतेत पाच वर्षात ४५ हजार मेगावॅटने वाढ करण्यात येईल व ती ८१ हजार मेगावॅट होईल. ऊर्जा परिवर्तन योजनेनुसार महावितरणने नवीकरणीय ऊर्जेच्या वापरावर भर दिला आहे.

आगामी काळातील वापरासाठी करण्यात आलेल्या वीज खरेदी करारांमध्ये प्रामुख्याने हरित ऊजेर्चे करार आहेत. यामुळे २०३० मध्ये राज्याचा हरित ऊर्जा वापर सध्याच्या १३ टक्क्यांवरून वाढून ५२ टक्क्यांवर जाईल.

यामुळे पर्यावरण रक्षणासोबतच वीजखरेदी खर्चात ६६ हजार कोटी रुपयांची बचत होणार आहे. यामुळेच महावितरणने राज्य विद्युत आयोगासमोर वीजदर निश्चितीसाठी दाखल केलेल्या याचिकेत आगामी पाच वर्षात टप्प्याटप्प्याने विजेचे दर कमी करण्याची अनुमती मागितली आहे. तसेच महावितरणने उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा हटविण्याचा प्रस्ताव मांडला आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० या योजनेच्या अंतर्गत राज्यात ठिकठिकाणी सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारून त्यावर कृषी फीडर चालविण्यात येणार आहेत. यामुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा होईल. राज्यात या योजनेची अंमलबजावणी गतीने सुरू आहे.

आगामी वर्षामध्ये या योजनेच्या माध्यमातून राज्यातील सर्व कृषी पंप सौर ऊर्जेवर म्हणजेच हरित ऊर्जेवर चालविण्यात येणार आहेत. या योजनेत १६ हजार मेगावॅटची सौर ऊर्जा निर्मिती क्षमता विकसित करण्यात येत असून ऊर्जा परिवर्तनामध्ये या योजनेचा महत्त्वाचा वाटा आहे.